बुधवार, २० मार्च २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २०७
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

•MARATHI •DAINIK •CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 20 MARCH 2024 adhunikkesari.com •YEAR-03 •ISSUE-207 •RNI : MAHMAR/2021/82566 •PAGE-12 •PRICE-05

# सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली निवडणूक घ्या : खा. डेरेक ओब्रायन

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेस पक्ष सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली लोकसभा निवडणूक घेण्याची मागणी करत आहे, असे खा. डेरेक ओब्रायन यांनी एक्सवर (ट्विटर) केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. पश्चिम बंगालच्या पोलीस महासंचालकांना हटवण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिल्यानंतर तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांकडून केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर टीका होत आहे.**





निवडणूक आयोगाने शनिवारी लोकसभा निवडणुकीची घोषणा केली. देशभरात सात टप्प्यांत लोकसभेची निवडणूक पार पडणार आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने सोमवारी निवडणूक आयोगाने सहा राज्यांतील गृह सचिवांना हटवण्याचे आदेश दिले. याचवेळी पश्चिम बंगालच्या अतिरिक्त पोलीस महासंचालकांनाही हटवण्याचे आदेश देण्यात आले. यावरूनच आता तृणमूल काँग्रेसचे राज्यसभा खासदार डेरेक ओब्रायन यांनी केंद्र सरकारवर टीका करत गंभीर आरोप केले आहेत. तसेच लोकसभेची निवडणूक सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली घेण्याची मागणी केली आहे. भारतीय जनता पार्टी गलिच्छ राजकारण करून निवडणूक आयोगासारख्या संस्थेला संपविण्याचे काम करत आहे. भाजपा लोकांचा सामना करण्यासाठी एवढी घाबरत आहेत की, विरोधी पक्षाला संपवण्यासाठी निवडणूक आयोगाला पक्षाच्या कार्यालयात बदलण्याचे काम करत आहे. जनतेने निवडून दिलेल्या राज्य सरकारने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात येत आहेत. त्यामुळे ही लोकसभेची निवडणूक सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली घेण्यात यावी, अशी मागणी खा. डेरेक ओब्रायन यांनी केली. लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यामुळे आता विरोधक आणि सत्ताधारी आमने-सामाने आले आहेत. तर दुसरीकडे तृणमूल काँग्रेस इंडिया आघाडीत आहे. मात्र, तरीही पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी थेट ४२ लोकसभा उमेदवारांची यादी जाहीर केली. त्यामुळे इंडिया आघाडीत बिघाडीची चर्चा सुरू आहे.

महत्त्वाची बातमी

## ज्योती मेटे जाणार शरद पवार गटात

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** शिवसंग्रामचे नेते दिवंगत विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटे बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करणार आहेत. बीड लोकसभा मतदारसंघातून त्या उमेदवार असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या अजित पवारांसोबत असलेल्या बजरंग सोनवणे यांनी देखील काही दिवसांपूर्वी शरद पवारांची भेट घेतली होती. मात्र बजरंग सोनवणे यांच्या ऐवजी शरद पवारांकडून ज्योती मेटेंना झुकते माप मिळण्याची शक्यता आहे.
भाजपकडून पंकजा मुंडे यांना लोकसभेची उमेदवारी देण्यात आलीय. त्यामुळे पंकजा मुंडेंच्या विरोधात महिला उमेदवार देण्याला पसंती मिळू शकते. मराठा आरक्षणाबाबत नेहमी आग्रही राहिलेले शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत विनायक मेटे यांच्या ज्योती मेटे या पत्नी आहेत. मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी बीडमध्ये तीव्र आंदोलने गेले काही दिवसांमध्ये पाहायला मिळाली आहेत. या पार्श्वभूमीवर शरद पवारांकडून मराठा आंदोलनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची सांगड घालण्यात येत असल्याचे बोलले जात आहे. बीडची जागा महाविकास आघाडीत शरद पवारांना सुटण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादीत झालेल्या बंडखोरीवेळी धनंजय मुंडे अजित पवारांच्या गटात सहभागी झाले.



राज्याच्या महायुतीमध्ये आता मनसेचा समावेश होणार हे निश्चित झाले असून राज ठाकरे यांनी मंगळवारी दिल्लीमध्ये केंद्रीय मंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीमध्ये लोकसभेच्या जागावाटपावर चर्चा झाली आहे. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मनसेला एक किंवा दोन जागा मिळू शकतात.

## राज ठाकरेंशी युती करून भाजपा कोणत्या तोंडाने उत्तर भारतीयांची मते मागणार : अतुल लोंढे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय जनता पक्षाने राज ठाकरेंच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला महायुतीत घेऊन भाजपाने उत्तर भारतीय बांधवांचा फक्त विश्वासघातच केला नाही तर त्यांच्या जखमेवर मीठ चोळून त्यांच्या स्वाभिमानाला धक्का लावला आहे. उत्तर भारतीय बांधवांना लाठ्या काठ्यांनी मारणा-या राज ठाकरेंना सोबत घेऊन भारतीय जनता पक्ष कोणत्या तोंडाने उत्तर भारतीयांची मते मागणार आहे? असा सवाल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी उपस्थित केलेला आहे. यासंदर्भात प्रतिक्रिया देताना अतुल लोंढे म्हणाले की, छट पुजेला विरोधी करणारे, उत्तर भारतीयांना मारहाण करणाऱ्या तसेच नेहमी उत्तर भारतीयांचा द्वेष करणाऱ्या राज ठाकरे यांच्या मनसेला भारतीय जनता पक्ष निवडणुकीसाठी महायुतीत घेत आहे, हा तमाम हिंदी भाषकांचा अपमान आहे, त्यांच्याशी गद्दारी आहे. 'अब की बार ४०० पार' च्या वल्गणा करणाऱ्या भाजपाला 'एरा गैरा नत्थू खैरा', ज्या पक्षाकडे एखादा आमदार आहे त्यांना सोबत घेण्याची गरजच का पडावी? ज्या उत्तर भारतीयांना मनसेने मुंबईतून हुसकावून लावले त्यांच्या गृहराज्यात भाजपाला मते मागण्याचा अधिकार राहिलेला नाही. राज ठाकरेंच्या मनसेशी युती करण्याची वेळ भाजपावर आली याचाच अर्थ भाजपाने महाराष्ट्रात तरी लढाईच्या आधीच पराभव मान्य केल्यासारखे आहे.
बाँड जनता पक्षाने उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीचे सरकार कटकारस्थान करून पाडले, त्यानंतर उद्धव ठाकरेंचा शिवसेना पक्ष व चिन्हही चोरले, शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाही फोडला, एवढे करूनही भाजपाला महाराष्ट्रात लोकसभा निवडणुक अवघड जात आहे हे दिसल्यानेच त्यांना ठाकरेंच्या विरोधात दुसरा ठाकरे उभा करावा लागतो एवढी नामुष्की भाजपावर आलेली आहे. भाजपा लोकसभा जिंकण्यासाठी काहीही करो परंतु त्यांचा पराभव अटळ आहे, असेही अतुल लोंढे म्हणाले.



**आणखी एक ठाकरे चोरण्याचा प्रयत्न :** अर्धापूर येथे झालेल्या मेळाव्यात उद्धव ठाकरे म्हणाले की, त्यांना आता असे कळले आहे की, महाराष्ट्रात मत पाहिजे असतील तर मोदी या नावाने मत मिळणार नाही . ठाकरेंच्या नावाने महाराष्ट्रात मत मिळतात . म्हणून बाळासाहेब ठाकरेंचा फोटो चोरला . काही फरक पडत नाही . आता आणखी एक ठाकरे चोरण्याचा प्रयत्न केला जात आहे . घेऊन जा, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी भाजपवर केली आहे . यासाठी तुम्हाला सगळ्यांना एकच विनंती करत आहे की, नुसते जल्लोषात राहू नका, आपण 100 टक्के जिंकणारच आहोत . पण जिंकण्यासाठी प्रयत्न केल्याशिवाय जिंकता येणार नाही, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे .

# बिन पगारी फुल्ल अधिकारी, गृहरक्षकाचा जीव मेटाकुटीला

## निष्काम सेवा करायची तरी किती वर्षे...?

आधुनिक केसरी न्यूज


सचिन कोरडे

धाराशिव : 1946 मध्ये बॉम्बे प्रांतात होमगार्ड युनिटची स्थापना झाली. कोणत्याही संकट वेळी, अडचणीच्या परिस्थितीत नागरिकांना सुरक्षा प्रदान करण्यासाठी मदत करणे हा त्याचा मूळ उद्देश होता. परंतु 1962 च्या चीन युद्धा दरम्यान पोलिसांना पुन्हा एकदा मदतनीस गरज भासू लागली आणि 06 डिसेंबर 1962 रोजी होमगार्ड संघटनेची पुनर्रचना करण्यात आली. तेव्हापासून होमगार्ड विभाग 6 डिसेंबर रोजी स्थापना दिवस साजरा केला जातो. आज मानवाच्या दैनंदिन गरजा खूपच खर्चिक झालेल्या आहेत. केंद्राचा कर्मचारी असो या राज्याचा कर्मचारी यांचा पगार दोन दिवस जरी पुढे गेला तर त्याच्या जीवाची घालमेल होते. ईएमआय, मुलांच्या शाळेची फी, विविध प्रकारची बील सर्व काही डोळ्यासमोर येऊ लागतं. तिसऱ्या चौथ्या असे होत होत सातव्या वेतन वाढ दिलेल्या राज्याच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्य शासनाने राज्यातील पोलिस पाटलांच्या मानधनात आता वाढ करण्यात आली आहे. मंत्रिमंडळाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. पण निष्काम सेवा देणाऱ्या गृहरक्षकाच्या वेतन भत्ता वाढ करण्यासाठी निर्णय घेणे गरजेचे आहे. राज्यातील होमगार्ड हे पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून काम करतात. पोलिसांचे कामाचे तास व होमगार्डच्या कामाचे तास समान असून दोघांच्या कामाचे स्वरूप देखील सारखेच आहे. असे असताना होमगार्ड यांना निष्काम सेवा या नावाची सुंदर उपमा देऊन कायम अल्प वेतन देऊन शासन त्यांच्याकडुन काम करून घेत आहे. कुठलाही बंदोबस्त आला की, होमगार्ड यांना लगेच पाचारण केले जाते. त्यांना बंदोबस्त



कधी येईल याची आधी थोडीशी ही कल्पना नसते. त्यामुळे मोबाईलवर मेसेज आला की, कधीही, केव्हाही बॅग भरायची व हजर रहायचे. कारण वर्षातुन दोन ते तीन महिनेच हे काम असते. यामुळे ते पार्ट टाइम म्हणुन इतर व्यवसाय करून कुटुंबांचा उदरनिर्वाह करतात. अधिकाऱ्यांना अनेक कामानिमित्त, घडलेल्या घटनांची माहिती देण्यासाठी मोबाईल, फोन लावावा लागतो. तो खर्चही होमगार्डला मिळत नाही. ऑनलाइन प्रणालीमुळे तर जिल्ह्यात मिळेल त्याठिकाणी ड्युटीला पळावे लागत आहे. आज घडीला शेतात कामाला जाणाऱ्या शेतमजुरांना देखील ५०० रूपये हजेरी मिळते. त्या मानाने होमगार्डना रात्री अपरात्री कुठेही कधीही बंदोबस्त करून देखील अगदी तुटपुंजे मानधन दिले जाते. त्यामुळे कुटुंबांचा उदरनिर्वाह कसा चालवायचा असा प्रश्न तमाम होमगार्ड यांच्या समोर उभा असतो ? महिला होमगार्ड यांच्या समस्या तर सांगण्या पलीकडच्या आहेत. असे एका महिला होमगार्ड कडून सांगण्यात आले.
पूर्वी होमगार्ड यांची बंदोबस्त ड्युटी जिल्हा तालुकास्तरा वरून लावला जात असे. यामुळे होमगार्ड ज्या ठिकाणी राहतो ते ठिकाणी व ड्युटीचे ठिकाण जवळ होते. आता परीस्थिती वेगळी आहे.मुंबईच्या होमगार्ड कार्यालयातून बंदोबस्त लावला जातो. यात कोणाची कुठेही अंतराची मर्यादा न ठेवता ड्यूटी लावली जाते. मानधनाच्या तुलनेत ड्यूटी परवडत नसल्याचे म्हटले जात आहे. पोलिसांचा अधिकचा Yमदतीला वेळोवेळी असणार्यां होमगार्डच्या कुटूंबाचा तरी विचार शासनाने करून मानधन वाढवावे. अथवा कायमस्वरूपी मानधनासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी होत आहे.

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




# पुण्यातील आनंदाश्रम संस्था : एक दीपस्तंभ

आधुनिक केसरी

कागदाचा शोध आणि छपाईचा शोध हा बऱ्याच नंतर लागला. परंतु त्यापूर्वी ग्रंथ हातानेच लिहिले जात. त्यासाठी भूर्जपत्र, ताडपत्र किंवा रेशमी कापडाचा वापर केला जाई. क्वचित ताम्रपत्रावर देखील लेख लिहिले जात. हाताने ग्रंथ लिहिणे हे अत्यंत जिकीरीचे होते. ताडपत्र किंवा भूर्जपत्र किंवा रेशमी कापड यावर लिहिण्यापूर्वी त्यावर विशिष्ट प्रकारची प्रक्रिया करावी लागायची आणि नंतरच त्यावर लिहिता यायचे. परंतु आपल्या पूर्वजांनी आणि ऋषीमुनींनी धर्म, तत्त्वज्ञान, विज्ञान, आयुर्वेद इत्यादी विषयांवर मूलभूत चिंतन करून अशा प्रकारचे ग्रंथ हाताने लिहून ठेवले आहेत. हे त्यांचे आपल्यावर मोठे उपकार आहेत. प्राचीन काळातील नालंदा, तक्षशिला यासारख्या विद्यापीठांमध्ये अशा प्रकारची हस्तलिखिते मोठ्या प्रमाणात होती. परंतु भारतावर झालेल्या विविध अशा आक्रमणांमध्ये आक्रमकानी हा मौल्यवान असा ठेवा नष्ट केला. काहीनी तो ठेवा आपल्या सोबत परदेशात नेला तर काही मौल्यवान ग्रंथ तत्कालीन लोकांनी त्यांचे प्राणापलीकडे संरक्षण केल्यामुळे वाचले. आपल्याला प्राचीन भारतीय संस्कृती, धर्म, तत्त्वज्ञान, प्राचीन काळातील लोकांची जीवनशैली आदी गोष्टी समजून घ्यायच्या असतील तर अशा प्रकारची प्राचीन हस्तलिखिते फार मोलाची ठरू शकतात.

संस्थेच्या तळमजल्यावरील ग्रंथालयात दुर्मिळ अशी हस्तलिखिते जीवापाड जपून ठेवली आहेत. बरीचशी हस्तलिखिते संस्कृत भाषेत आहेत. काही मराठी आणि काही तमिळ भाषेतील आहेत. 'ही हस्तलिखिते जतन करणे म्हणजे एक आव्हानात्मक काम असते. बरीचशी हस्तलिखिते जीर्ण झाली आहेत. त्यांना वाळवी लागण्याचा धोका असतो. सुरुवातीच्या काळात त्या हस्तलिखितातील पानांमध्ये वेखंडाची भुकटी टाकून कापडी गाठोड्यात ती बांधून ठेवली जायची. पण आता प्रत्येक हस्तलिखिते ब्रशच्या साहाय्याने हळुवार साफ केली जातात.



## आनंदी पहाट

# अध्यात्मात संवेदनशीलता प्राप्त होते

आधुनिक केसरी

अध्यात्मात भावना, संवेदना किंवा असा विश्वास आहे की, माझ्यापेक्षा काहीतरी मोठे आहे, संवेदनात्मक अनुभवापेक्षा मानव असण्यापेक्षा काहीतरी अधिक आहे आणि ज्याचा आपण भाग आहोत. त्यामागचे कारण, तो वैश्विक किंवा दैवी निसर्ग हे आहे. अध्यात्म आपल्या चांगल्या भविष्यासाठी आपला दृष्टीकोन मजबूत करते. जीवनात आपल्याला नेहमीच आव्हानांचा सामना करावा लागतो, परंतु त्या कठीण काळात आपण आशावादी राहिलो तर आपण निश्चितच सक्षम होऊ शकतो. सध्याची परिस्थिती, त्या परिस्थितील सर्व सामान्य मनुष्य, त्यांच्या अडीअडचणी, त्या अडचणींच्या निवारणार्थ शोधात असलेल्यांची मानसिकता ह्या विषयांचा सविस्तर खुलासा करून घेणे अधिक आवश्यक आहे. ह्या गुरुतत्वात सकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार करण्याची योग्य दिशा प्राप्त होत असते. ज्यायोगे सर्वत्र सकारात्मक वातावरणाची निर्मिती होत राहते. अध्यात्म तीन पैलूंनी बनलेले आहे; नातेसंबंध, मूल्ये आणि जीवनाचा उद्देश हे होत. आपण प्रत्येकाने आपल्या आध्यात्मिक गरजा समजून घेतल्या पाहिजेत. आध्यात्म हा मानसिक आणि शारीरिक उपचारांचा अविभाज्य घटक आहे. अध्यात्म संकट समयी अंतर्गत शक्तीचा स्त्रोत असल्याचे आपण जाणून घेतले पाहिजे. ते आपल्या कल्याणाच्या केंद्रस्थानी असून आपल्या जीवनातील सर्व पैलूना समृद्ध करते. शारीरिक, मानसिक, भावनिक आणि नातेसंबंध दृढ करण्यास उपयुक्त ठरते. आपल्या कौटुंबिक गरजांसाठी व्यावहारिक, समजूतदार आणि शांत दृष्टिकोनाला प्रोत्साहन देते. आपल्या अंतःप्रेरणेवर आत्मविश्वास देते आणि यशाकडे जाण्यासाठी आवश्यक ती शक्ती प्रदान करते. आध्यात्मिक तंदुरुस्ती, उद्देश निर्माण करण्यासाठी एक महत्त्वाची पायरी म्हणजे स्व- मूल्यांकन करणे होय. आपल्या जीवनाचे सात परिमाण समृद्ध करण्यासाठी वैयक्तिक योजना करण्याची गरज असते. आपले मन, शरीर, आत्मा, प्रेम, कार्य, खेळ, जग ह्याचा त्याच्याशी थेट संबंध असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## गवसले मला | बालपण ||


माय बाप गेले | गेला लडिवाळ ||
आता कैसा खेळ | भातुकीचा ? ||१||
बालपण गेले | गेले समाधान ||
सारी धुळधाण | आयुष्याची ||२||
रूसणे फुगणे | सारेच संपले ||
स्वार्थीच उरले | भाळी आता ||३|
हाती दिला टाळ | टाळण्या व्यथेला ||
कर्माच्या गीताला | सूर गावे ||४||
वारीत रमलो | नामात चिंबलो ||
आत्ममग्न झालो | अभंगात ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## हितगुज





गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)


## विश्वकल्याणाची ओढ

महात्म्याला विश्वकल्याणाची ओढ असते. दैन्य, कारुण्य नष्ट करण्यासाठी तो योद्धा बनून दुष्ट, आसुरी शक्तींशी संघर्ष करतो. अशा महान व्यक्तीला सिद्धगुरूचे शिष्यत्व लाभले की चैतन्याचा शक्तिकल्लोळ कर्मरत होतो. भगवद्गीता त्याच्या कृतीतून साकारते, उक्तीतून प्रासंगिक बनते. वैराग्याचा मूतिर्मंत पुतळा बनून असे सद्गुरू समाज जीवनाचे उदात्तीकरण घडवून आणतात. थोडक्यात, अध्यात्म सामाजिक उन्नतीचा मूलाधार आहे. मंदिरातून मूर्ती काढून टाकल्यावर ते जसे भकास, ओसाड, सुने होईल, तसेच मनातून ईश्वराला हद्दपार केल्यावर माणसाची स्मृती, अस्तित्व, भविष्य यांना ओसाडपण प्राप्त होईल. श्रीकृष्ण गायी चारणारा गोपाल आहे. तो काठीने गायी हाकत नाही. त्याच्या मुरलीच्या नादाने गायी इशारे समजतात. 'गो' शब्दाचे इंदीय, किरण, ज्ञानचेतना, पृथ्वी, गाय असे अनेक अर्थ आहेत. त्या आधारे आमच्या इंद्रियांवर अंकुश ठेवून आमच्या ज्ञानचेतनेला योग्य दिशा देऊन तृप्त करणारा गोपाल-श्रीकृष्ण निरंतर हृदयात रहायला हवा. त्याच्या मुरलीची-धुन सर्व व्यापांतून, तापांतून मनामध्ये झिरपावी. मनाची मरगळ निघून जावी, पावित्र्याने वेढलेल्या विचारांची गोधुली सार्या अस्तित्वावर व्यापून राहावी. त्यातून जीवन कामधेनू बनेल. अध्यात्म अशा प्रकारे वैराग्यातून महारागाकडे मनाला घेऊन जाते व जीवनाची सरसता, सकारात्मकता वाढवते. 'तुज सगुण म्हणू की निर्गुण रे, तू एक गोविंदु रे' गाणार्या संत ज्ञानेश्वरांनी जनहितासाठी, मनाच्या विशालतेसाठी वैराग्यपूर्ण योगाला कारुण्याने सजल करून जीवनाच्या सार्थकतेची भावार्थ-दीपिका प्रज्ज्वलित केली. 'वेणुगोपालाची' व्यक्तिगत आराधना केल्याशिवाय विशाल जनसमूहाच्या सहस्रावधी अस्तित्वांचा आधार असलेल्या शेषशायी नारायणत्वाचे दर्शन होत नाही.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अनुभव ज्ञान आनन्द में,
सनी वाक परभाव ।
जिज्ञासू के बोध का,
कारण होय स्वभाव ।।११।।
(स्वर्वेद द्वितीय मण्डल नवम अध्याय)
०२/०९/११
मूळ भाष्याचा मराठी अनुवादः
ब्रह्मविद्येच्या ज्ञान-आनंदाने भरलेली वाणी प्रभावी असते, ज्यामुळे उत्तम कोटीच्या जिज्ञासूंना शीघ्र बोध शांती प्राप्त होते.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

# नाम घेण्याला काहीही आड येत नाही

आधुनिक केसरी

आपण असे पाहू की, नामात प्रेम येण्याकरता एक एक सत्कर्म करीत राहणे सुलभ, की ते नामच विचाराने, सर्व संतांनी कळवळ्याने सांगितले आहे म्हणून, जरूर तर बळजबरीनेसुद्धा घेत राहणे, हे सुलभ ? समजा एक यंत्र आहे, त्यात पुष्कळ चक्र आहेत, आणि ते यंत्र चालू करण्याचा हेतू धरला आहे. आता एखाद्याने त्यांतले एखादेच चक्र चालू करू म्हटले तर ते चालू होईलच असा भरवसा नाही. पण त्या सर्व चक्रांचा संबंध असणारी कळ आपण दाबली, तर मात्र बिनतक्रार आणि अत्यंत अल्प प्रयासाने ते यंत्र सहज चालू करता येईल. त्याप्रमाणे, नाम ही कळ जर धरली तर सत्कर्मरूपी सर्व चक्र एकदम फिरू लागून आपले काम निश्चीतपणे आणि सुलभपणे होईल. म्हणून, हमखास आणि सहज रीतीने काम व्हावे अशी ज्याची इच्छा असेल त्याने कशाही रीतीने का होईना नाम घ्यायला लागावे. नाम घ्यायचे एकदा पक्के ठरविले म्हणजे काहीही आड येत नाही. व्यवहारात आपण पाहतोच की, एखादी गोष्ट समर्थनीय नसली



तरी करायचा निश्चय केला की मनुष्य ती करतोच. मग नाम घेण्याचा जर निश्चय केला तर का नाही होणार ? काहीही केले तरी शेवटी नामाशिवाय गत्यंतर नाही; तर मग ते घेण्यात विलंब किंवा चालढकल करण्यात काय अर्थ आहे ? म्हणून, कोणत्याही तऱ्हेच्या शंका-कुशंका न घेता, कशाही तऱ्हेने पण नाम घेत राहावे हे उत्तम; म्हणजे विनाकारण काळ फुकट घालविला अशी पश्चात्तापाची पाळी येणार नाही. जग हे अनेक मोहक वस्तूंनी भरले आहे. त्या वस्तू आपण पाहिल्या किंवा नुसत्या ऐकल्या तरी हव्याशा वाटतात, आणि त्या मिळविण्याचा आपण प्रयत्न करतो. म्हणून देवाजवळ आपण अशी प्रार्थना करावी की, ' देवा, मोहक वस्तू मला दाखवूच नकोस, कारण माझी इच्छा तिकडे जाईल आणि मी फसेन. देवा, माझे ज्यात खरे हित आहे तेच मला दिसो, तेच मी ऐको, त्याचेच मला स्मरण होवो, आणि त्याचीच मला गोडी लागो. ' प्रह्लाद, द्रौपदी यांसारख्या भक्तांनी देवाजवळ काय मागितले ? तेच आपण मागावे, आणि त्यांनी निष्ठा ठेवली तशीच आपणही ठेवावी. त्यांच्या ठिकाणी जसे वैराग्य होते, तसे आपल्या ठिकाणी आणण्याचा प्रयत्न करावा. प्रयत्न करीत असताना प्रथम चुका होतील, पण त्या झाल्या तर पश्चात्ताप व्हावा. ' देवा, मी फार दोषी, अपराधी आहे, मला क्षमा कर आणि तुझ्या कृपेला पात्र कर. ' पश्चात्ताप खराच झाला तर राम कृपा करीलच. मुखाने नाम घ्यावे, हाताने प्रपंचाचे काम करावे, आणि अंतःकरणात समाधान ठेवावे. १४. जो नाम घेऊ लागेल त्याचे मन बाहेर धावण्याचे हळूहळू कमी होते.

## अनिर्वाच्यनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

पोकळ कवचामध्ये भरीव धान्य सापडते. त्याप्रमाणे धान्य निवडून परब्रम्ह रूपी अर्थ समजल्यावर फोलपट रूपी शब्द आपोआपच गळून पडतात. म्हणून आत्मसाक्षात्काराशी शब्द जाऊ शकत नाहीत. समर्थानी आपले भाषेचे तत्वज्ञान यात सांगितले आहे. आपली मराठी भाषा किती ज्ञानी आहे त्यासाठी 5 तत्वज्ञाच्या भाषा विषयक गोष्टी सांगितल्या आहेत. 1)भाषेचे प्रधान कार्य 2)शब्द अर्थ यांचा संबंध 3)अर्थाचे स्वरूप काय. 4)अर्थ आणि सद्वस्तु यांचा संबंध काय 5)जे अनिर्वाच्य आहे ते भाषेत किती व कसे आणता येते. भाषेला दोन अंगे असतात शब्दोच्चार हे भाषेचे बाह्यांग आणि शब्दांश हे भाषेचे अंतरंग आहे.

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, २० मार्च २०२४

adhunikkesari.com


# स्वराज्य संकल्पक शहाजी महाराज', 'स्वराज्य सारथी जिजाऊ' ग्रंथांचे प्रकाशन

## डॉ. संजय गायकवाड यांना शहाजी महाराज साहेब जीवनगौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांच्या 430 व्या जयंतीच्या निमित्ताने हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रेरक आदर्श तथा मार्गदर्शक, स्वराज्य संकल्पक शहाजी महाराज आणि राष्ट्रमाता जिजाऊसाहेब यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा आणि आलेख सुस्पष्ट करणारे 'स्वराज्य संकल्पक शहाजी महाराज' आणि 'स्वराज्य सारथी जिजाऊ' या दोन ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. लेखक तथा व्याख्याते डॉ. संजय गायकवाड यांनी लिहिलेली ही दोन ग्रंथ म्हणजे शिवप्रेमीसाठी एक मोठी पर्वणी आहे. शहाजी महाराजांनी स्वराज्याची संकल्पना कशा पद्धतीने स्वतःही पूर्ण केली आणि शिवबाच्या माध्यमातूनही यशस्वीरित्या पूर्ण करून घेतली तथा स्वराज्य स्थापनेसाठी मासाहेब जिजाऊंनी कशा पद्धतीने स्वराज्याचे सारथ्य केले हे अनुक्रमे ह्या दोन्ही ग्रंथात सप्रमाण मांडलेले आहे.
शहाजी महाराजांच्या जयंतीच्या निमित्त आयोजित शहाजी महाराज स्मारक समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात नागपूर संस्थानाचे मुधोजीराजे भोसले यांच्या हस्ते या ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. व्याख्याते तथा शहाजी महाराज स्मारक जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. रवींद्र बनसोड अध्यक्षस्थानी होते. पुणे येथील नामांकित जिजाई प्रकाशनच्या वतीने हे पुस्तक काढण्यात आलेले आहे. डॉ. संजय गायकवाड यांच्या लेखन, भाषण, अध्यापन आणि व्याख्यान या कार्याची विशेष नोंद समितीने घेतली. यामुळे स्वराज्य संकल्पक शहाजी महाराज समितीच्या वतीने डॉ. गायकवाड यांना ह्या प्रसंगी 'शहाजी महाराजसाहेब जीवनगौरव पुरस्कार' घोषित करून तथा स्मृतीचिन्ह देऊन मुधोजीराजे भोसले आणि शिवाजीराजे जाधव यांच्या हस्ते गौरविण्यात आले.
सिंदखेड राजा येथील शिवाजीराजे जाधव, शहाजी महाराज आंतरराष्ट्रीय जयंती महोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष किशोर चव्हाण, डॉ. पाटील टी. आर., इंजि. तानाजी हुसेकर, शशिकांत शिरसाठ, अशोक वाघ, परमेश्वर नलावडे, संदीप सरकटे, नाना कदम, ऋषिकेश बेदरे, सौ. कल्पना बनसोड, पानिपत येथून आलेल्या सरदार घराण्याच्या वंशज हितीदिदी, विजय काकडे, प्रा. भाऊसाहेब शिंदे, बापूसाहेब छत्रे, योगेश केवारे, डॉ. उद्धव काळे, मेजर नारायण भोसले यांची विशेष उपस्थिती होती. योगेश शेळके आणि उद्धव काळे यांनी सूत्रसंचालन केले तर विलास पांगारकर यांनी आभार मानले. याप्रसंगी शिवप्रेमी तसेच सिल्लोड तालुक्यातील ज्ञानविकास प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# अगस्ती ऋषि मंदिरात त्रिदिनात्मक धार्मिक सोहळयास धर्मध्वजपूजनाने प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** बुद्रुक व साईनाथनगर शिवारातील प्रवरानदीच्या तीरावर असलेल्या अगस्ती ऋषि मंदिराच्या ७ व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने आयोजित त्रिदिनात्मक ज्ञानेश्वरी पारायण व शिवपुराण कथा सोहळयास मंगळवार दि.१९ मार्च रोजी धर्म ध्वजारोहण करून प्रारंभ करण्यात आला. यावेळी अगस्ती ऋषि मंदिर प्रांगणात झालेल्या कार्यक्रम प्रसंगी अगस्ती आश्रमाचे महंत ज्ञानगिरीजी महाराज,महंत गंगागिरीजी महाराज, पारायण व्यासपीठ चालक हभप भानुदास महाराज भिसे यांच्या हस्ते धर्मध्वजपूजन करून वेदमंत्राच्या जयघोषात त्रिदिनात्मक सोहळयाचा धर्मध्वजारोहनाने प्रारंभ करण्यात आला.
यावेळी झालेल्या धर्मध्वजारोहण कार्यक्रम प्रसंगी नानासाहेब डौले, भीमराज माने, संजय भाकरे, भाऊसाहेब हिरगळ, गोरक्षनाथ माने, गणेश होडगर,बबन बरकडे, खंडू होडगर, अनाजी कोळपे, नारायण हिरवे, संदीप मगर, संतोष होडगर, सोमनाथ मगर, हनुमंत हिरगळ, दुर्योधन चंद, सोन्याबापू माने, सचिन मगर, राहुल दरंदले, ज्ञानेश्वर चामुटे,लक्ष्मण चामुटे, नामदेव कुटे, पप्पू बोरुडे,तुकाराम बाचकर, जानकु बाचकर यांच्यासह भाविक उपस्थित होते. श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबा व १००८ महामंडलेश्वर महंत श्री शिवगिरीजी महाराज त्रंबकेश्वर यांच्या कृपा आशीर्वादाने श्री क्षेत्र देवगड संस्थानचे प्रमुख महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज व अगस्ती आश्रमाचे महंत श्री ज्ञानगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या त्रिदिनात्मक सोहळयामध्ये पहाटे ४ ते ६ काकडा,६ ते ७ विष्णू सहस्त्रनाम,सकाळी ७ ते ११ ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायातील पारायण, ११ते १ महाप्रसाद,दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ,७ ते ९ यावेळेत महंत शिवगिरीजी महाराज त्र्यंबकेश्वर यांच्या सुश्राव्य वाणीतून शिवपुराण कथा होणार आहे. शुक्रवारी दि.२२ मार्च रोजी श्री क्षेत्र देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या सकाळी यावेळेत होणाऱ्या काल्याच्या किर्तनाने त्रिदिनात्मक सोहळयाची सांगता होणार आहे.अगस्ती ऋषि मंदिराच्या ७ व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमाचा व शिवपुराण कथा श्रवणाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन अगस्ती ऋषि आश्रम भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# फडणवीसांना जेलमध्ये टाकले पाहिजे : ठाकरे

आधुनिक केसरी न्यूज

**हिंगोली :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरेंनी जाहीर सभांचा धडाका लावला आहे. मंगळवारी उद्धव ठाकरे हे हिंगोलीच्या दौऱ्यावर आहे. उमरखेड येथे त्यांनी जनसंवाद मेळाव्यातून जनतेशी संवाद साधला. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पंतप्रधान नरेंद्र मोदी, फडणवीस यांच्यावरही त्यांनी सडकून टीका आहे. ते म्हणाले की, खरंतर फडणवीसांना जेलमध्ये टाकलं पाहिजे.
उद्धव ठाकरे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस एका इंटरव्यूमध्ये म्हणाले की, मी परत आलो, दोन घरं फोडून आलो. खरंतर त्यांना घर फोडले म्हणून जेलमध्ये टाकले पाहिजे. अंतरवाली सरासरीमध्ये मी आणि शरद पवार सुरुवातीला गेलो होतो. जरांगे पाटील कोण लागतात आमचे. पण तुम्ही महिलांवर लाठीचार्ज करता, असा हल्लाबोल त्यांनी यावेळी फडणवीसांवर केला आहे. ते पुढे म्हणाले की, त्यांनी बाण आणि पक्ष चोरला पण मी जिथे जातो तिथे गर्दी वाढते आणि त्यांच्या पोटात दुखते. हे समीकरण करून आपण सरकार चालवलं, त्या काळात सर्वोत्तम मुख्यमंत्री म्हणून नाव माझं होत पण यश तुमचे होते. लोकसभा निवडणुक जवळ आली आहे. गद्दार येवून दोन वर्ष झाली त्या काळात मी आलो नाही. त्यांचे काम पाहिलं. हे म्हणतात सरकार आपल्या दारी पण हे सरकार अमित शाह यांच्या दारी आहेत. कटपुतलीचा खेळ चालू आहे. तिसरी दोरी यांच्या तंगड्या वर होणार आहे. मिंधेंना भरपूर दिलं पण काहींना भस्म्या रोग असतो, अशी टीका त्यांनी यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर केली आहे. 2014 पासून मोदीजी सरकारला सांगत होते.जो जनतेशी दिवसाढवळ्या खोटं बोलतो तो मला खोटं ठरवतोय. तुमच्यापेक्षा ठाकरे घराण्याला महाराष्ट्र चांगला ओळखतो. मोदी-शाह यांच्या सात पिढ्यांचा हिशोब मांडा आणि माझा मांडा, असे आव्हान त्यांनी यावेळी दिले. मुस्लिम आज शिवसेनेसोबत का येतोय? भाजपला सोडलं पण खरं हिंदुत्व सोडलं नाही. आपलं हिंदुत्व वेगळं आहे. त्यांचं थापा मारणारा हिंदुत्व आहे. मोदी धनगर मराठा समाजाच्या शिष्टमंडळांना भेटले का? त्यांना अतिरेक्यांना भेटायला वेळ आहे पण हक्कासाठी झगडणाऱ्यांसाठी नाही, अशी टीका त्यांनी यावेळी केली.

# नेवासा पंचक्रोशी परिक्रमा पायी दिंडी सोहळ्याची काल्याच्या कीर्तनाने सांगता

## संत संगतीत राहून केलेल्या परमार्थाने मनुष्य जीवाचा उद्धार : हभप रामेश्वर महाराज कंठाळे

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** देवदेवतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्री क्षेत्र नेवासा पंचक्रोशीचे महत्व कळण्यासाठी निघालेल्या पंचक्रोशी परिक्रमा पायी दिंडी सोहळयाची संत ज्ञानेश्वर माऊलींची कर्मभूमी नेवासा येथे मंगळवारी दि.१९ मार्च रोजी भेंडा येथील हभप रामेश्वरजी महाराज कंठाळे यांच्या झालेल्या काल्याच्या किर्तनाने उत्साहपूर्ण वातावरणात सांगता करण्यात आली.संत संगतीत परमार्थ करून मनुष्य जीवाचा उद्धार करा असे आवाहन हभप रामेश्वर महाराज कंठाळे यांनी यावेळी बोलताना केले. पंचक्रोशी परिक्रमा दिंडीचे चालक हभप रामेश्वर महाराज कंठाळे यांच्या झालेल्या काल्याच्या कीर्तन प्रसंगी दिंडी ह भ प रामायणाचार्य नंदकिशोरजी महाराज खरात, हभप भगवानजी महाराज जंगले शास्त्री,हभप ऋषिकेशजी महाराज वाकचौरे गोंधवणी,हभप श्रीहरी महाराज वाकचौरे, हभप गहिनीनाथ महाराज आढाव, चांगदेव महाराज काळे,राजेंद्र महाराज आसने, कानिफनाथ महाराज जाधव,विशाल महाराज गिरमे,संत ज्ञानेश्वर मंदिर संस्थानचे विश्वस्त कृष्णाभाऊ पिसोटे, मंदिराचे सेवक शिवाजीअप्पा होन,मच्छिंद्र महाराज भोगे आदि करून अनेक प्रतिष्ठित व वारकरी महिला भाविक उपस्थित होते

यावेळी बोलताना हभप कंठाळे महाराज म्हणाले की पंचक्रोशी परिक्रमा दिंडीत ठिकठिकाणी उत्स्फूर्त स्वागत भाविकांनी केले त्याबद्दल त्यांना धन्यवाद देत ते म्हणाले की संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झालेली आहे झालेल्या पंचक्रोशी परिक्रमामुळे या देव भूमीला प्रदक्षिणा घालण्याचे मोठे पुण्य दिंडीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांना मिळाले तसेच दिंडी मार्गावर सेवा देणाऱ्या वारकऱ्यांना गावकऱ्यांना मिळाले असे सांगून त्यांनी संत संगतीत राहून परमार्थ करा व मनुष्य जीवाचा उद्धार करा असे आवाहन यावेळी बोलताना केले.

संत ज्ञानेश्वर महाराज पैस खांब मंदिराचे निर्माते वैकुंठवाशी गुरुवर्य श्री बन्सी महाराज तांबे यांच्या कृपाशिर्वादाने व तमाम वारकरी संप्रदायातील महाराज व वारकरी यांच्या सहकार्याने पंचक्रोशी परिक्रमा करण्यासाठी ही दिंडी श्री क्षेत्र नेवासा येथून निघालेली होती.ही दिंडी पंचक्रोशी प्रदक्षिणा करून पुन्हा श्री ज्ञानेश्वर मंदिर श्री क्षेत्र नेवासा दि.१८ मार्च रोजी मुक्कामी आली

मंगळवार दि.१९ मार्च रोजी संत ज्ञानेश्वर महाराज पैस खांब मंदिरात झालेल्या हभप रामेश्वर महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर महाआरतीने पंचक्रोशी परिक्रमा दिंडी सोहळयाची सांगता करण्यात आली.योगदान देणाऱ्या दात्यांचा गौरव श्रीफळ प्रसाद देऊन करण्यात आला.उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करून या पंचक्रोशी प्रदक्षिणा दिंडी सोहळयाची सांगता करण्यात आली.



# मिटकरींची प्रतिक्रिया

आधुनिक केसरी


मागील काही दिवसांपासून सुरु असलेल्या अजित पवार विरुद्ध शरद पवार वादात अजित पवारांचे बंधू श्रीनिवास पवार यांची एन्ट्री झाली आहे. तर, श्रीनिवास पवार यांनी अजित पवारांच्या भूमिकेला विरोध करत शरद पवारांसोबत राहण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, यावर आता अजित पवार गटाची देखील प्रतिक्रिया येतांना पाहायला मिळत आहे. तर, भावाच्या विरोधात भावाला उभे करण्याचा कुटील डाव असून, शरद पवार गट भावनिक वातावरण निर्माण करत असल्याचा आरोप अमोल मिटकरींनी केला आहे.
श्रीनिवास पवार यांनी अजित पवारांबद्दल केलेल्या व्यक्तव्यावर बोलताना अमोल मिटकरी म्हणाले की, आजपर्यंत श्रीनिवास पवार साहेब राजकीय क्षेत्रात दिसले नाही. ते त्यांचा व्यवसाय सांभाळत होते. पण, काही दिवसांपूर्वी अजितदादांनी भाष्य केले होते की, माझ्या परिवारातील काही लोक माझ्यासोबत नसतील, पण बारामतीतील जनता माझे परिवार असेल. श्रीनिवास पवार काटेवाडीमध्ये काल जे काही बोलले, ही जुनीच पद्धत आहे. घरात एकमेकांच्या विरोधात लोकांना उभे करायचे. एकमेकांच्या विरोधात सख्खे भावांना उभे करून, आपण निवडणूक जिंकू असे त्यांना वाटत असेल, तर हा तुमच्या भ्रमाचा भोपळा आहे हे वरिष्ठांनी लक्षात घेतले पाहिजे. बारामतीची जनता अजित पवारांचे कुटुंब आहे. अजित पवार आतल्या गाठीचे राजकारणी नसून, त्यांना डाव कपट जमत नाही. अजित पवारांच्या विरोधात त्यांच्या सख्ख्या भावाला उभे करण्याचा हा कुटील डाव असल्याचे अमोल मिटकरी म्हणाले. पुढे बोलताना अमोल मिटकरी म्हणाले की, आम्ही साहेबांच्या सोबत आहोत असे सांगून तुम्ही भावनिक वातावरण निर्माण करत आहात. मात्र, साहेबांच्या मार्गदर्शनाखालीच आजपर्यंत अजित पवार घडले आहे. आतापर्यंत ज्या ज्या घडामोडी घडल्या किंवा 2019 मधील भाजपला पाठिंबा देण्याचा निर्णय साहेबांचाच होता. 2019 ला भाजपने पाठिंबा न मागता त्यांना शरद पवार पाठिंबा देऊ शकतात आणि आता तीच अधिकृत भूमिका घेतली असेल तर अजित पवारांना आरोपीच्या पिंजऱ्यात कशासाठी उभा करत आहे. त्याच्यामुळे हे भावनिक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. या भावनिक वातावरणाचा कुठलाही फरक पडणार नाही. अजित पवारांचा परिवार हा तेवढा पुरता नाही, त्यांच्या आईच्या पोटी आम्ही जन्माला आलो नसलो तरी वैचारिकदृष्टीने आम्ही त्यांच्यासोबत बांधील आहोत. आम्ही रक्ताचं पाणी करू, रात्रीचा दिवस करू, मात्र एवढेच प्रतिष्ठेची जागा तुम्ही करत असाल, तर आम्ही देखील सुनेत्रा पवार यांचा विजय खेचून आणणार असल्याचे मिटकरी म्हणाले. श्रीनिवास पवार साहेब यांनी अलीकडेच राजकारणात एन्ट्री केली आहे. एवढे दिवस ते का बोलले नाही. सातबारा ज्येष्ठांच्या नावाचा आहे मान्य आहे, पण कर्तुत्व लागत असते. एखादाच्या वडिलाकडे चारशे एकर शेती असेल, तो सातबारा वडिलांच्या नावावर असेल. पण, त्या शेतीची मशागत करणारा त्यासाठी पात्र असेल तरच त्या शेतीला अर्थ आहे. शरद पवारांचा, यशवंतरावांचा वारसा अजित पवारांनी सांभाळला आहे हे श्रीनिवास पवारांनी मान्य केले पाहिजे, असे भावनिक विषय निर्माण करून जाणीवपूर्वक संभ्रमाचे वातावरण निर्माण करण्यात कोणतेही अर्थ नाही.

# महाडचे चवदार तळे : काळजात पेटलेला क्रांतीसंगर

आधुनिक केसरी

**महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाडच्या चवदार तळ्याचे पाणी ओंजळीत घेऊन प्राशन केले आणि जनसमुदायाच्या घोषणांनी तो परिसर दुमदुमून गेला. त्या दिवशी हजारोंच्या संख्येने 'अस्पृश्य' लोक त्या तळ्याकाठी जमले होते. सगळ्यांनीच मग बेधडक त्या पाण्याला स्पर्श केला.धर्मसत्तेच्या प्रचंड जोखडाखाली असलेला तो काळ होता. हजारो वर्षांपासून लादला गेलेला धर्मसत्तेचा कायदा त्या दिवशी लोकांनी डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली तोडून टाकला. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या अनुयायांसोबत महाडच्या चवदार तळ्याला स्पर्श केला आणि जणू काही पाण्याला आगच लागली. पिढ्यानपिढ्या ज्या शुद्रातिशुद्र, अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या मानवी समुहाला पाणी या नैसर्गिक देणगीपासून वंचित ठेवण्यात आले होते.**

त्या अस्पृश्यांनी पाण्याला स्पर्श केल्यानंतर तेथील तत्कालीन समाजव्यवस्थेतील सवर्ण समजल्या जाणाऱ्या लोकांनी एकच हल्लकल्लोळ केला. काठ्यालाठ्यांनी या आपल्या हक्कासाठी कायदेशीरपणे लढा देणाऱ्या माणसांवर हल्ला केला. लोकांची डोकी फुटली. पिण्याच्या पाण्यासाठी आंदोलन करणारी माणसं रक्तबंबाळ झाली. अचानक झालेल्या हल्ल्याने सैरावैरा पळू लागली. बायकांना मारहाण झाली. बैलगाड्या मोडून काढल्या. भांडी फोडली. जेवणाचे साहित्य मातीत मिसळून टाकले. पण गावागावांतून आंबेडकरी माणसांच्या काळजात हा असंतोष धुमसू लागला. चवदार तळ्याच्या प्रकरणानंतर लगेच खोटी अफवा उठवली गेली की अस्पृश्य देखील वीरेश्वराच्या मंदिरात प्रवेश करण्याचा विचार करत आहेत. यावेळी बांबूच्या काठ्या घेऊन सशस्त्र लोकांचा मोठा जमाव रस्त्यावर उतरला. विविध गावांतून आलेल्या लोकांना गावाकडे परतताना मारहाण करण्यात आली. तसेच त्यांच्या गावातील माणसांना शिक्षा करण्याचे संदेशही त्यांच्या पोरांना पाठवले. त्यामुळे अनेक लोकांवर एकतर ते त्यांच्या गावात पोहोचण्यापूर्वी किंवा नंतर हल्ले केले गेले. महाडच्या जातीय हिंदूंना डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या साथीदारांची क्रांतिकारी कृती आवडली नाही. काही चवताळलेल्या उच्च जातीय पंडितांनी चवदार तळ्याचे शुद्धीकरण म्हणून तब्बल १०८ मोठमोठे रांजण भरून 'पंचकर्म' केलेले पाणी त्या तळ्यात मिसळले व अस्पृश्यांनी दुषित केलेले तळे शुध्द करून, त्या तळ्याचे पाणी वापरण्यास पुन्हा एकदा बंदी घातली. त्यांनी अपवित्रीकरण पूर्ववत करण्यासाठी शुद्धीकरण विधी केले. या दंगलीत दलितांची घरे भुईसपाट झाली, संसार उध्वस्त झाले, जनजीवन रसातळाला लागले, अन्न धान्याची नासाडी झाली, कैक लोकांचे प्राणही गेले. बाबासाहेब आंबेडकरांना देखील शासकीय विश्रामगृहात आश्रय घ्यावा लागला होता. हे सगळे सुरू असतानाच, तळे खाजगी मालमत्ता असून त्याचे पाणी विना परवाना वापरल्यामुळे बाबासाहेब आंबेडकरांविरुद्ध गुन्हाही नोंदवण्यात आला. कायद्याचा मान राखत बाबासाहेबांनी तूर्तास सत्याग्रह मागे घेतला आणि आपल्या दलित बांधवांना शिक्षण, स्त्री-पुरुष समानता या विषयांकडे लक्ष केंद्रित करण्यास सांगितले. परंतु माणसं आतबाहेरुन पेटली होती. महाडच्या चवदार तळे सत्याग्रहापूर्वीच १९२३ साली त्या सरकारने आदेश दिला होता की सगळी सार्वजनिक ठिकाणे, सोयी सुविधा जसे पाण्याचे नळ, शाळा, मंदिरे, इस्पितळे, इत्यादी दलितांसाठीसुद्धा खुले करण्यात यावे. सगळ्या नगरपालिकांनी, पंचायतींनी या निर्णयाचे स्वागतही केले. पण या निर्णयाला समाजातील तथाकथित उच्च जातीच्या लोकांचा ठाम विरोध होता. त्यांच्या या विरोधाला शरण जाऊन, काही नगरपालिका, पंचायती या निर्णयाला अंमलात आणणे टाळत होत्या. ज्यामुळे कायदेशीररित्या अधिकार असून देखील दलित या सुविधांपासून वंचितच होते. त्यावेळी बाबासाहेब म्हणाले होते की, महाडचे स्पृश्य लोक अस्पृश्य लोकांना चवदार तळ्याचे पाणी पिऊ देत नाहीत याचे कारण, अस्पृश्यांनी स्पर्श केला असता ते पाणी नासेल किंवा त्याची वाफ होऊन ते नाहीसे होईल अशामुळे नव्हे, अस्पश्यांना ते पिऊ देत नाहीत याचे कारणे हेच, की शास्त्रांनी असमान ठरविलेल्या जातींना आपल्या तळ्यात पाणी भरू देऊन त्या जाती आपल्यासमान आहेत असे मान्य करण्याची त्यांची इच्छा नाही. चवदार तळ्याचे पाणी प्याल्याने तुम्ही-आम्ही अमर होऊ अशातला काही भाग नाही. आजपावेतो चवदार तळ्याचे पाणी प्यालो नव्हतो तरी तुम्ही-आम्ही काही मेलो नव्हतो. चवदार तळ्यावर जावयाचे ते केवळ त्या तळ्याचे पाणी पिण्याकरिता जावयाचे नाही. इतरांप्रमाणे आम्हीही माणसे आहोत हे सिद्ध करण्याकरिताच त्या तळ्यावर



आपणास जावयाचे आहे. म्हणजे ही सभा समतेची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी बोलाविण्यात आली आहे, हे उघड आहे. यावरून बाबासाहेबांची सत्याग्रहामागची भूमिका स्पष्ट होते. आज या घटनेला ९७ वर्षे झाली आहेत. जवळपास एक शतक उलटल्यानंतर आपल्या देशातील आजची स्थिती काय आहे? आपल्या देशात अनेक सार्वजनिक ठिकाणी, मंदिरात आजही दलित व मागासवर्गीयांना प्रवेशास बंदी आहे. सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी प्यायला, मिशा राखल्या, लग्नात घोड्यावर बसला, दुचाकी किंवा चार चाकी वाहन वापरले, चांगले घर बांधले, स्वच्छ व टापटीप कपडे घातले, उच्च शिक्षण घेतले म्हणून दलितांना मारहाण केली जाते किंवा प्रसंगी ठार मारले जाते. प्रेम प्रकरणातून, नेतृत्व पुढे आले म्हणून, रिंगटोन वाजली म्हणून, मुख्य चौकात भीमाचे गाणं डीजेवर वाजलं म्हणून, नीळ उधळली म्हणून, सवर्णांच्या गल्लीतून भीमजयंतीची मिरवणूक काढली म्हणून अशा अनेक घटनांमधून वस्तीवरील हल्ले, मारहाण, खून असे प्रकार घडतच आहेत. एवढेच नव्हे तर आपली बरोबरी करणाऱ्या अख्ख्या बौद्ध कुटुंबालाच संपविण्याचे कारस्थान महाराष्ट्रात घडले. तसेच देशातील इतरत्र ठिकाणीही काही वेगळी परिस्थिती नाही. भारतीय संविधानाने सगळ्यांना समान हक्क दिले आहेत. जाती-धर्म-लिंग-भाषा-वंश इत्यादीवरून भेदभाव करण्यास बंदी घातली आहे. परंतु याची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी मात्र होत नाही. वर्णव्यवस्थेवर आधारित ब्राह्मण्यवादी मानसिकता आपल्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनावर अधिराज्य गाजवित आहे.

आम्ही सुद्धा आमच्या लहानपणी वरुन वाढलेले पाणी प्यायलो आहोत. चहा घ्यायचा झाला तर त्यांनी वापरत नसलेल्या फुटक्या कपात किंवा बशीत घ्यावा लागत असे. जेवणाच्या पंगतीत सोबत तर बसू दिले जात नव्हतेच पण आपण आपल्या पाण्याची सोय करावी लागत असे. पाणी पिण्यासाठी आम्ही आडनाव बदलले पण उघडकीस येऊन अनेकवेळा मार खाल्ला आहे. पाण्यासाठी वेगवेगळ्या विहिरी किंवा हातपंप असत. त्यांच्या विहिरीतून पाणी काढले किंवा हातपंपास स्पर्शही केला तर दंगल होत असे. वस्तीला वाळीत टाकले जात असे. शेतावर कामाला असतांनाही हीच वागणूक मिळत असे. अनेक वेळा चोरून पाणी प्यावे लागायचे. ओहोळ, नदी किंवा नाल्याच्या पाण्यावर तहान भागवली जात होती. आम्ही पाणी पिऊ नये म्हणून पाणी पिण्याच्या छोट्या मोठ्या विहिरीत सवर्णांनी पोहण्याचे किंवा लघवी करण्याचे प्रकारही घडले आहेत. आम्ही घाणेरड्या ठिकाणचे पाणी प्यायलो की त्यांना समाधान वाटत होते. शाळेत तर पिण्याच्या पाण्याची सोयच नव्हती. पाणी प्यायचे झाले तर बाहेरच्या हातपंपाचे पाणी प्यावे लागत होते किंवा घरी जाऊनच मग पाणी प्यावे लागायचे. सवर्ण मित्रांच्या घरी जाऊन पाणी प्यायची वेळ आली तर त्याच्या घरचे पाणी लांबून आणि वरुन वाढण्यासाठी सांगत. अनोळख्या ठिकाणी कोरड्या घशाने 'पाणी वाढा हो' असे अगतिकपणे म्हणावे लागले होते. ते सारे आजही डोळ्यासमोर लख्ख दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली महाडचा जो सत्याग्रह झाला, ती एक प्रतीकात्मक कृती होती. सनातनी वृतीच्या लोकांना ती अजिबात रुचली नव्हती. त्यांनी प्रतिहल्ला केला होता. महाड गावात दलित वस्तीवर तोडफोड आणि जाळपोळ केली. त्यात अनेक जण जखमी झाले होते. नंतर सनातनी लोकांनी मंत्रोच्चारासह गौमूत्र आणि शेणाने तळ्याचे शुद्धीकरण केले होते. पुढे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात गेले. तो कायदेशीर लढा दहा वर्ष चालला. पुढे निकाल दलितांच्या बाजूने लागला. स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाने समस्त भारतीयांना समान हक्क बहाल केले. परंतु आज जवळपास एक शतक उलटून गेले तरी पाण्याचा लढा सुरूच आहे. उन्हाळ्यात आजही अनेक गावांतील आंबेडकरी वस्त्यांमध्ये पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवत असते. तीन चार दिवस कधी कधी पंधरा पंधरा दिवसांनी पाणी येते. ग्रामपंचायतीसूद्धा पाण्याच्या टँकरवाटपात हस्तक्षेप करतात. लोकांच्या सनातनी मानसिकतेत आजही फरक पडलेला नाही. पाण्यासाठी मोर्चा काढावा लागतो. आंदोलने निदर्शने करावी लागतात. हर घर शुद्ध जल ही फसवी योजना आहे. लोकांना पिण्याचे शुद्ध पाणी विकतच घ्यावे लागते. ते मोफत हवे पण मिळत नाही. महाडचा क्रांती संग्राम हे काळजात पेटलेले युद्ध आहे. कितीही आधुनिकीकरण आणि शहरीकरण झालेले असले तरी पाण्याचा प्रश्न कायम आहे. समतेच्या प्रस्थापनेसाठी कायम लढत राहावे लागणार आहे.

प्रज्ञाधर ढवळे, नांदेड
मो. ९८९०२४७९५३



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# रिल्सच्या महापुरात काय प्रदर्शीत होतयं

आधुनिक केसरी

**गुणवत्ता, विद्वत्ता ही प्रदशिर्त झाली पाहिजे या मध्ये शंका नाही पण त्या सोबत वेडेपणा प्रदर्शित होण हे कोणासाठीही हितकारक नाही.आपण जे कृत्य करतो त्याच अनुकरण इतर लोक करत असतात मानव हा अनुकरण शील प्राणी आहे.त्या अनुषंगाने जितक जास्तीत जास्त चांगलं हितकारक सत्यनिष्ठ निर्माण करता येईल ते उत्तम पण सार्वजनिक पातळीवर रिल्सच्या मुसळधार पावसाने सोशल मिडिया वर जो काही धुमाकूळ घातला आहे. त्याचे चांगले वाईट परिणाम सुद्धा पाहण गरजेचं आहे.नेमक हि आपली गुणवत्ता,विद्वत्ता आहे कि वेडेपणाची विकृती या पैकी नेमकं काय आपण करतोय याचं देखील मुल्यमापन झालं पाहिजे.**

आपल्या स्वतःच्या कल्याणा सोबतच जगाच्या कल्याणासाठी त्या मध्ये काही आहे का हे पण महत्वाचं आहे. अन्यथा फक्त इतरांनी केले म्हणून आपण काही तरी करा याला फार काही मोठा अर्थ उरत नाही.मुळात हे सगळं करताना समाजहितकारक व स्वहित कारक असलं पाहिजे. ते ज्ञान आहे अथवा विद्वत्ता आहे असं म्हणणं योग्य होईल. आपल्या मध्ये असणारी गुणवत्ता विद्वत्ता हि बाहेर आली पाहिजे हि काळाची गरज आहे. आपली विद्वत्ता आणि गुणवत्ता प्रकट झाली पाहिजे पण वेडेपणा प्रदशिर्त होऊ नये याची काळजी स्वतः घेणं सुद्धा तितकंच गरजेचे आहे.अन्यथा हा शुद्ध वेडेपणा ठरेल.व सगळ्यात मोठं नुकसान असेल या मधून होणारा तोटा हाच आहे कि चांगल्या हितकारक रिल्स पण मग लोक पाहणारं नाहीत म्हणजे एक प्रकारे आपण चांगलं कर्म करण तर सोडाच पण वाईट कर्म करण्यात सहभागी होत आहेत. आपण निर्माण केलेली रिल्स हि कशी आहे हे आपल्याला समजलं पाहिजे पण शक्यतो असं होतं नाही आपण स्वतः सोडता इतरांना समजतं आपल्याला ते समजतही नाही आणि उमजतही नाही.हि शोकांतिका आहे.याच रिल्सच्या मुसळधार पाऊसामुळे ब-यापैकी बेकारीचा विसर तरूण पिढीला पडल्याच जाणवतं आहे.पण यांचे गंभीर परिणाम तात्काळ नाही तर पुढील काही कालावधी मध्ये नक्की निर्दर्शनास येतील अनेक जण रिल्स निर्माण करण्यासाठी आपला जीव धोक्यात देखील घालतात म्हणजे हे आगीत तेल ओतल्यासारख आहे. मोबाईल हा आपली सोय आहे याचा अर्थ असा नाही कि आपण मोबाईलच्या आहारी जाऊन आपलं भान देखिल विसराव आणि साध्य तरी आपण भानविसरण्याच्या अंतिम टप्प्यात आहेत असंच प्रथम दर्शनी जाणवतं आहे.मोबाईल किती कसा कशासाठी वापरला पाहिजे हि सर्व साधारण बाब आहे.पण आज तसं नाही कशासाठी आणि कुठे ही रिल्स तर विचारता सोय नाही. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक झाला कि ती बाबा संपुष्टात येते हा निसर्गाचा नियम आहे.माणुस हा असा प्राणी आहे कि तो कोणतीही बाब व्यवस्थित उपभोग घेत नाही.आता मोबाईलचच पाहा आजुन त्या मध्ये सुधारणा होत असताना नेटवर्क मध्ये देखील दिवसेंदिवस सुधारणा होत टुजी फोरजी फाईवजी आजुन काही काही मग एवढा प्रचंड डाटा आपण कुठं वापरणार आहोत पर्यायाने मग शेवटी हे नवीन काम आपल्याला लागलं असच म्हणावं लागेल. मुळात आवश्यक बाबी आवश्यक असतात पण आवश्यकता आणि विवेक यांचा योग्य ताळमेळ असेल तर भान हरपत नाही.सोशल नेटवर्कर वर रिल्सचा पाऊस आणि तो हि असा मुसळधार कि त्या पावसा समोर दुसरं काही सुद्धा दिसायला तयार नाही.नशा हि फक्त अंमली पदार्थांचीच नसते जीवन निरर्थक मार्गावर घेऊन जाणारी प्रत्येक बाब हि नशाच आहे. मोबाईल डाटा आणि नवे नवे उपक्रम या मध्ये आपण इतके व्यस्त झालोय कि आपल्याला आपण कोण हाच विसर पडला आहे बाकी उद्योग व्यवसाय कामधंदा, रोजगार सगळं रिल्स समोर गौण आहे.अस समजुन एक प्रकारे रोजगार,व्यवस्था,उद्योग स्वहित या आशा अनेक बाबी कडे आपलं दुर्लक्ष होत आहे.आणि तरूण पिढीला बेकाराची विसर पडला आहे हे विशेष आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# संघर्ष माणसाला घडवतो: प्राचार्य ढोले

आधुनिक केसरी न्यूज



**शहरटाकळी :** कोणतेही यश हे सहज मिळत नसतं त्यासाठी परिश्रमाची पराकाष्टा करावी लागते. संघर्ष माणसाला घडवतो. प्रत्येकाने यशस्वी होण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असावं. असे प्रतिपादन प्राचार्य कांतेश्वर ढोले यांनी केले. शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने विद्यालयाचे माजी विद्यार्थी महेश साहेबराव आम्ले यांची भारत सरकार नोटरी पब्लिक पदी निवड झाली. त्याबद्दल विद्यालयात आयोजित गुणगौरव कार्यक्रम प्रसंगी प्राचार्य ढोले बोलत होते.

यावेळी सत्कारमूर्ती महेश आम्ले यांनी आपल्या मनोगतातून जीवन संघर्ष विद्यार्थ्यांसमोर मांडला. तसेच आयुष्यात यशस्वी होण्यासाठी काही गुरुमंत्र दिले. व विद्यालयाने दिलेले शिक्षण,संस्कार हे कायम सोबत असल्याने यश प्राप्ती झाल्याचे यावेळी सांगितले. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून म्हणून सामाजिक कार्यकर्ते शेषेराव आपशेटे, ग्रामपंचायत सदस्य संदीप राऊत , हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठानचे रामचंद्र गिरम, पत्रकार रविंद्र मडके, मेजर रमेश नरवडे , दत्तात्रय गादे ,सुभाष बरबडे ,पांडुरंग भालेराव,महेश भालेराव, ज्येष्ठ नागरिक साहेबराव आम्ले,विमलताई आम्ले , पर्यवेक्षिका अंजली चिंतामण,संस्था प्रतिनिधी अनिल मगर, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक पर्यवेक्षिका अंजली चिंतामण, सूत्रसंचालन दिपक बोडखे यांनी केले.

## चाकणमध्ये हॉटेल मालकावर गोळीबार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** चाकणमध्ये ‘हॉटेल मराठा’च्या मालकावर दोघांनी गोळीबार केल्याचं समोर आलं आहे. स्वप्नील उर्फ सोप्या संजय शिंदे अस गोळीबारात जखमी झालेल्या हॉटेल मालकाचे नाव आहे. सुदैवाने यात तो थोडक्यात बचावला आहे. या प्रकरणी राहुल पवार आणि अजय गायकवाडवर गोळीबार केल्याप्रकरणी चाकण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी अजय गायकवाडला चाकण पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

इंदापूर येथे हॉटेलमध्ये बसलेल्या एका व्यक्तीची गोळ्या झाडून आणि कोयत्याने वार करून हत्या करण्यात आली होती. अशाच प्रकारे चाकणमध्ये हत्येचा प्रयत्न केल्याची घटना समोर आली आहे. सुदैवाने यात तो व्यक्ती बचावला आहे. आरोपी राहुल पवारच्या भावाची चार महिन्यांपूर्वी हत्या करण्यात आली होती.



## वरुडीत मतदार जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** जि.प.उ.प्रा. शाळा, वरुडी भाग क्रमांक 201 येथे मतदार जनजागृती मोहीम राबविण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी काढून विविध घोषणा देऊन मतदान जनजागृती करण्यात आली तसेच मतदारांचे SELFIE POINT वर सेल्फी घेण्यात आल्या. याप्रसि शिक्षण विस्तार अधिकारी प्रकाश लोखंडे यांनी मतदारांना आवाहन करून त्यांना मतदानासाठी आपला हक्क बजवावा या साठी मार्गदर्शन केले. यावेळी BLO अमोल लाड, शाळेचे मुख्याध्यापक श्री गोरे सर्व शिक्षक गावचे सरपंच कल्याणजी गलधर तथा गावकरी मतदार उपस्थित होते.

## दिव्यांगाना अंत्योदय योजनेचा लाभ मिळणार : अमित जेधे

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** दिव्यांगाना राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत अंत्योदय योजनेचा लाभ द्या अशी मागणी बहुजन दिव्यांग( अपंग )क्रांती सेनेच्या वतीने करण्यात आली होती याबाबत प्रशासनाने मागणीची दखल घेत दिव्यांगांना अंत्योदय योजनेचा देण्याचे मान्य केले असून आता सदर योजनेचा लाभ दिव्यांगांना मिळणार असल्याची माहिती दिव्यांग क्रांती सेनेचे संस्थापक अमित जेधे यांनी दिली.

यावेळी बोलताना अमित जेधे म्हणाले की दिव्यांगाना अंत्योदय योजनेतील ३५ किलो धान्याचा लाभ मिळावा म्हणून ग्रामीण भागाकरिता ४४ हजार इतके तर शहरी भागाकरिता ५९ हजार इतकी उत्पन्न मर्यादा आहे आमच्या संघटनेतील सर्व दिव्यांगाची उत्पन्न मर्यादा ही ४४ हजाराच्या आत असल्याने या सर्व दिव्यांगाना राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत अंत्योदय योजनेचा लाभ दयावा अशी मागणी आम्ही केली होती. सदर मागणीची दखल प्रशासनाने न घेतल्यास दि.१२ मार्च रोजी धरणे आंदोलन करण्यात येणार होते मात्र तहसीलदार डॉ.संजय बिरादार यांनी वरील मागणी बाबत चिकित्सा करून सदरची मागणी योग्य असल्याचे सांगत दिव्यांगांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत लाभ दिला जाईल असे लेखी दिल्याने आंदोलन स्थगित करण्यात येऊन प्रशासनाला धन्यवाद देत आभार मानण्यात आले. सदर निवेदन प्राप्त झाल्यानंतर नेवासा तालुक्याचे आमदार शंकरराव गडाख यांनी याबाबत प्रशासकीय अधिकाऱ्यांना सूचना केल्या होत्या त्यानंतर जिल्हाधिकारी अहमदनगर, पुरवठा विभाग नेवासा, तहसीलदार नेवासा यांनी मागणीची दखल घेत अंत्योदय योजनेचा लाभ देण्याचे आश्वासन दिले. यावेळी बहुजन दिव्यांग क्रांती सेनेचे संस्थापक अमित जेधे,रामभाऊ केंदळे, अशोक पाटोळे,गणी पठाण, मोहिनीराज बडवे, रहीम शेख यांच्यासह सदस्य उपस्थित होते.

## देशमुख प्रतिष्ठानचे कार्य विद्यार्थ्यांना प्रेरणादायी : संयोजनी राजेनिंबाळकर

आधुनिक केसरी न्यूज



**कळंब :** येथील अॅड. दिलीपसिंह देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या देशमुख प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने गेल्या दहा वर्षांपासून अविरतपणे शालेय विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व, निबंध लेखन, सामान्य ज्ञान, चित्रकला स्पर्धा आयोजित केल्या जातात. प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी सदरील स्पर्धा आयोजित करून सौ. संयोजिनी ओमप्रकाश राजे निंबाळकर, . सौ. शुभांगी कैलास घाडगे पाटील, सौ. धनश्री रुपेश कवडे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. 51 विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, लेखन साहित्य, गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच या स्पर्धेसाठी कष्ट घेतलेल्या शिक्षक, मुख्याध्यापक यंदे मॅडम,राजेंद्र बिक्कड, राजेंद्र पवार, महादेव खराटे, बोधीसत्व वाघमारे यांचा छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा,शाल, श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी सौ .संयोजिनी ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या युगात अभ्यास करून, विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन आपलं, आईवडीलांचे, परिसराचे नांव उज्ज्वल करावे असे आवाहन केले. तसेच देशमुख प्रतिष्ठानच्या सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचे कौतुक सौ.शुभांगी कैलास घाडगे पाटील यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. सदरील उपक्रमात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाथर्डी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आढाळा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सात्रा, लता मंगेशकर विद्यालय कळंब,मॉडेल इंग्लिश स्कूल कळंब शाळेंनी सहभाग घेतला. कार्यक्रमासाठी ह .भ. प. महादेव महाराज आडसुळ,प्रा. दिलीप पाटील, ओंकार कुलकर्णी, संदिप कोकाटे मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, प्रतिष्ठानचे विश्वस्त पांडुरंग गुरव, संजय होळे,उपस्थित होते.

सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक अॅड.दिलीपसिंह देशमुख यांनी केले. सुत्रसंचलन महादेव खराटे व आभारप्रदर्शन सौ.संयुक्ता पृथ्वीराज देशमुख यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अॅड.पृथ्वीराज देशमुख, मॉडेल इंग्लिश स्कूलचे शिक्षक वृंद व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## ८५ जणांचे पोलीस संरक्षण काढून घेण्याचे आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध राजकीय पक्षांचे नेते, बांधकाम व्यावसायिक, सामाजिक कार्यकर्त्यांना देण्यात आलेले पोलीस संरक्षण काढून घेण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले. पुणे शहरातील विविध राजकीय पक्षाचे नेते, बांधकाम व्यावसायिक, सामाजिक कार्यकर्ते, तसेच प्रतिष्ठित नागरिकांना पोलिसांकडून संरक्षण व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येते. त्यासाठी पोलीस आयुक्तालयात अर्ज करावा लागतो. शहरातील ११० जणांना पोलिसांकडून संरक्षण (पोलीस प्रोटेक्शन) पुरविण्यात आले आहेत. पोलीस संरक्षण व्यवस्थेत ३५० जास्त पोलीस कर्मचाऱ्यांचा वापर करण्यात येत आहे. शहरातील ११० जणांना पोलीस संरक्षण पुरविण्यात आले आहे. त्यापैकी ८५ जणांचे पोलीस संरक्षण काढून घेण्यात आले. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस संरक्षण काढून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पोलीस संरक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचा वापर करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले. शहरातील संवेदनशील ठिकाणी ठेवण्यात आलेला पोलीस बंदोबस्त कायम राहणार आहे.



# वाघाच्या जिल्ह्याची डरकाळी लोकसभेत फोडणार

## सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला निर्धार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** विश्वगौरव पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी जगातील सर्वांत जास्त वाघ असणाऱ्या ताडोब्याचा 'मन की बात'मध्ये उल्लेख केला. आता जिल्ह्यातील वाघांचे प्रतिनिधित्व करीत, 'आम्ही मागास नाही' अशी डरकाळी लोकसभेत फोडायची आहे, असा निर्धार राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर-वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.
गांधी चौक चंद्रपूर येथे भव्य स्वागत समारंभात ते बोलत होते. यावेळी आमदार संजय रेड्डी बोदकुलवार, संदीप धुर्वे, अशोक उईके, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, महानगरा भाजपचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, भाजपा ज्येष्ठ नेते



चंदनसिंह चंदेल, लोकसभा प्रमुख प्रमोद कडू, देवराव भोंगळे, डॉ. मंगेश गुलवाडे, निलेश मत्ते , नितीन भटारकर, बंडू हजारे, जयप्रकाश कांबळे, राजू भगत, राजू कक्कड, प्रज्वलंत कडू, रवी बेलूरकर, संतोष पारखी, सविता कांबळे, ब्रिजभूषण पाझारे, सर्व समाजाचे धर्मगुरू, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते , नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.
चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर चंद्रपूर शहरात प्रथम आगमनानिमित्त ना. श्री. मुनगंटीवार यांचे जंगी स्वागत करण्यात आले. येथील गांधी चौकात त्यांनी चंद्रपूरकरांशी संवाद साधतांना ते म्हणाले, 'आज मी नागपूरपासून चंद्रपूरमधील गांधी चौकापर्यंत पोहोचत असताना जनतेचे प्रेम बघितले. कार्यकर्त्यांचा उत्साह बघितला आणि इथे असणाऱ्या महायुतीच्या सर्व नेत्यांचा पाठिंबाही बघितला. इथे सर्व धर्मगुरूंचा आशीर्वाद घेताना मी भारावून गेलो आहे.'
'मी तुमच्या आशीर्वादाच्या मोबदल्यात एकच वचन द्यायला आलेलो आहे. तुमच्या प्रेमाच्या कर्जाचे व्याज मी देईल ते फक्त आणि फक्त विकास करून. आता दिल्लीपर्यंत चंद्रपूरचा आवाज बुलंद करणार आहे. तुम्हाला मी आश्वस्त करतो की, की कन्याकुमारी ते काश्मीरपर्यंत आणि कामरूखपासून ते कच्छपर्यंत संसदेत चंद्रपूर, वणी, आर्णी लोकसभेचा आवाज हा नेहमी आघाडीवर असेन,' असे ना. श्री. मुनगंटीवार म्हणाले. 'मी कधीच मनामध्ये काम झाले आणि विसरलो असे केले नाही. मी तीन टर्म चंद्रपूर विधानसभेचा आमदार होतो. पण चंद्रपूर विधानसभेचे प्रतिनिधित्व नसताना मात्र कदापीही चंद्रपूरला विसरलो नाही, कारण मला याची जाणीव होती की, या शहराच्या, या मतदारसंघाच्या प्रेमाचे कर्ज माझ्यावर आहे. मी बल्लारपुर चा विकास करत असताना चंद्रपूरला कधीही विसरलो नाही', असे मुनगंटीवार यांनी नमूद केले.

# पुण्यासह गोवा, हैदराबाद विमानसेवा लवकरच

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**
**जळगाव :** येथून 17 मार्च 2024 जळगावकरांसाठी एक आनंदाची बातमी आहे. जळगाव विमानतळावरून उड्डाण ५.० योजनेंतर्गत 'फ्लॉय ११' विमान कंपनीला उड्डाण परवाना देण्यात आला असून गोव्यासह पुणे आणि हैदराबादसाठी विमानसेवा सुरू होणार असल्याची माहिती जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव यांनी बोलताना सांगितले आहे. ८ एप्रिलपासून गोवा, हैदराबादला, तर १ मेपासून पुण्यासाठी विमानसेवा सुरू होणार आहे.
मागील गेल्या तीन वर्षांपासून जळगावची विमानसेवा बंद पडली आहे. विमानसेवा अचानक बंद झाल्यानंतर, जळगाव विमानतळावरून कुठल्याही विमान कंपनीतर्फे विमानसेवा सुरू करण्यात आलेली नव्हती. गेल्या वर्षी उडान योजनेच्या तिसऱ्या राउंडमध्ये नवीनच स्थापन झालेल्या 'फ्लाय ९१' या विमान कंपनीने जळगावहून एकाच वेळी पुणे, गोवा व हैदराबादसाठी विमानसेवा सुरू करण्याची तयारी दर्शवली. यासाठी 'फ्लाय ९१' या विमान कंपनीने प्रस्ताव पाठविला होता.त्यानुसार भारतीय विमानतळ प्राधीकरण अर्थात डीजीसीएने उड्डाण 'फ्लॉय ११' विमान कंपनीला जळगाव विमानतळावरून उड्डाण परवाना दिला. यामुळे 'फ्लॉय ९१' कंपनीला गोवा, हैदराबाद तसेच पुणे विमानतळावरून मिळालेल्या स्लॉटनुसार विमानसेवा वेळापत्रक तयार केले आहे. या वेळापत्रकानुसार जळगाव विमानतळ विभागाकडून उड्डाण परवाना दिला आहे. तर या विमानसेवेचे वेळापत्रक अंतिम मंजुरीसाठी डीजीसीएकडे पाठविले असल्याची माहिती विमानतळ प्राधिकरण विभागाने दिली.
**असे राहणार विमानसेवेचे वेळापत्रक :** ८ ते ३० एप्रिलदरम्यान गोव्यावरून सकाळी ८:५५ वाजता जळगाव विमानतळावर विमानाचे आगमन होईल. तसेच हैदराबादला सकाळी ९:२५ वाजता जाईल. हैदराबादवरून दुपारी १:२५ मिनिटांनी जळगाव विमानतळावर आगमन होईल. तर गोव्याला १:५५ वाजता उड्डाण करेल. १ मे ते २६ ऑक्टोबरदरम्यान गोव्यावरून दुपारी ४:५ वाजता जळगावला विमान येईल. तर दुपारी ४:३५ वाजता हैदराबादला रवाना होईल. हैदराबादवरून रात्री ८:३५ वाजता विमान जळगावला येईल, तर रात्री ९:५ वाजता गोव्याला रवाना होईल.तसेच १ मेपासून पुण्यावरून सायंकाळी ६:३० वाजता जळगावला विमान येईल, तर सायंकाळी ७:२० वाजता पुण्याला विमान रवाना होईल वेबसाईट, विमानतळावरून करा तिकीट बुकिंग जळगाव विमानतळावरून गोवा, हैदराबाद तसेच पुणे येथे सेवा सुरू होणार आहे. त्यानुसार प्रवाशांना तिकीट बुकिंगसाठी 'फ्लॉय ९१' विमान कंपनीच्या अधिकृत वेबासाइटवरून तसेच जळगाव विमानतळावरदेखील तिकीट बुकिंगची सुविधा केली जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव यांनी दिली आहे.

# अनंत कुमार हेडगे यांना निलंबित करून देशद्रोहाची गुन्हे दाखल करा

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** भाजपाचे आनंतकुमार हेडगे यांनी रविवारी हवेली जिल्ह्यातील सिद्धपूर येथे जाहीर सभेत बोलताना, भारतीय संविधाना संदर्भात वादग्रस्त विधान केल्याने त्यांना राज्यसभेतून तात्काळ निलंबित करून त्यांच्यावर देशद्रोहाचे गुन्हे दाखल करावे, या संदर्भात जळगाव जामोद तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने 19 मार्च रोजी तहसीलदारामार्फत राष्ट्रपतींना निवेदन देण्यात आले.
देशात भाजपाचे सरकार असून अनेकदा संविधानाबाबत अपशब्द बोलण्याच्या घटना भाजपाच्या नेत्यांकडून घडल्या आहेत.भारतीय संविधानाची मूल्ये तुडवण्याचे काम सातत्याने भाजपाकडून होत आहे.एवढेच नाही तर लोकसभा निवडणुकीत भाजपाचे 400 पेक्षा जास्त उमेदवार निवडून आले तर भारतीय संविधानाचे नव्याने लिखाण केले जाईल अशा प्रकारे भारतीय संविधानाला टार्गेट करून संपवण्याचा घाट सध्या भाजपाच्या खासदारांकडून केला जात आहे. ही बाब आता लपून राहिलेली नाही भारतीय जनता पार्टीचा खरा चेहरा जनतेसमोर आला आहे. अशा प्रकारे खुलेआम संविधान बदलण्याची भाषा बोलल्या जात आहे.अनंतकुमार हेडगे यांनी अशा प्रकारे संविधानाबाबत केलेले



वक्तव्य वादग्रस्त असून त्यामुळे देशात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, देशासाठी आणि गरीबाच्या विकासासाठी भाजपाला बहुमताची गरज नसून राज्यघटना बदलण्यासाठी बहुमताची गरज असल्याचे भाजपाचे अनंतकुमार हेडगे यांच्या बोलण्यातून स्पष्ट जाणवते.
त्यामुळे अशा व्यक्तीवर तात्काळ कार्यवाही करून त्यांच्यावर देशद्रोहाची गुन्हे दाखल करण्यात यावे, अशा आशायाचे निवेदन तालुका काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष अविनाश उमरकर, डॉ.संदीप वाकेकर,ज्योती ताई ढोकणे,अर्जुन घोलप ,अच्छे खा हबीब खा, अजय सिंग राजपूत, प्रवीण भोपळे, कैलास बोडके, मिलिंद वानखडे, संजय मासाळ, विनोद तायडे ,बजरंग चिंचोळकर यांनी तहसीलदार यांच्याकडे दिले आहे.

# लोह्यात शुद्ध व शीतल पाणपोईचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** उन्हाळ्याची तीव्र दाहकता जाणवत असून पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांची भटकंती पाहता लोहा शहरातील सामाजिक कार्यकर्ते मधू पाटील पवार यांच्या पुढाकारातून कृषी उत्पन्न बाजार समिती कमान दोन समोर नागरिकांसाठी शुद्ध व शीतल पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली.
सदरील पाणपोईचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते मधू पाटील पवार व मुरंबीचे सरपंच राम पाटील पवार यांच्या हस्ते करण्यात आले.
दिवसेंदिवस उन्हाळा अधिकाधिक तीव्र होत असून पाण्याची तीव्र टंचाई होत असताना हॉटेल मध्ये पाणी पिण्यासाठी गेले असता चहा किंवा कांहीं घेतले तर पिण्यासाठी पाणी मिळेल असा सल्ला वजा सूचना हॉटेल व्यावसायिकांकडून नागरिकांना देण्यात येत असताना लोहा शहरातील सामाजिक कार्यकर्ते मधुकर पाटील पवार यांच्या पुढाकारातून लोहा नगर पालिका समोरील कृषी उत्पन्न बाजार समिती कमान दोन समोर शुद्ध व शीतल जलसेवा सुरू करण्यात आली असून सदरील पाणपोईचे उद्घाटन मधू पाटील पवार व सरपंच राम पाटील पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बहुसंख्येने नागरिकांची उपस्थिती होती.




# गरीब कुटुंबाला मदतीचा हातभार

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे शेखपूर (तकीया) येथील संपत शिंदे यांचे निधन झाले. कुटुंबाची स्थीती जेमतेम बेताची असल्याने बाजार सावंगी तलाठी सजाचे तलाठी नारायण पठ्ठे यांनी स्वतःहून कुटुंबाची आर्थिक मदतीचा हातभार लावला.
शेखपूर तकीया येथील संपत शिंदे गरिब कुटुंब असुण कमवते शिंदे यांचे निधन झाल्याने कुटुंब उघड्यावर आले. त्यांच्या पाश्चात पत्नी लहान पाच मुले असुण कुटुंब गरिब कुणी कमवता नसल्याने याची जाणीव तलाठी नारायण पठ्ठे यांनी ठेवून तातडीने आर्थिक मदतीचा हात दिला व आवश्यक वस्तू किराणा किट देवून सांत्वन केले तर पुढे कुटुंबाला संजय निराधार योजनातून फाईल करुन आर्थिक मदतीचा हात देण्याचे आश्वासन दिले. यावेळी उपसरपंच कारभारी नलावडे, तलाठी सहकारी सुधाकर नलावडे, गणेश गायकवाड यांची उपस्थिती होती.कुटुंबाला मदत दिल्याने नागरिकांनी तलाठी आप्पा चे कौतुक केले.

# विवाह योग घडून येत नसल्याने तरुणाई नैराश्येच्या गर्तेत

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** मुला-मुलीचा विवाह पूर्वीच्या काळी घरातील वडीलधारी मंडळी, कतै व्यक्ती परस्पर ठरवायचे. अनेकदा मुले-मुली एकमेकांना बेट लखातच पाहायचे, दोन कुटुंबांचे पूर्वापर चालत असलेले संबंध असल्याने अल्पवयातच विवाहाची तोंडी बोलणी व्हायची. मात्र, दिवसेंदिवस काळ बदलत आहे. समाजात चौकसपणा वाढला, माणसं हुशार झाली, मुला-मुलींचे उब शिक्षण झाले, संगणक आणि मोबाईलच्या युगात आणि करिअरचा विचार करून उत्पन्नाचा शिक्षणाचा विचार करून विवाह ठरायला लागले. अनेक प्रकारच्या गाँधाळातून आणि त्रासातून जाणारी ही क्रिया झाली आहे. विवाहास विलंब होणे, विवाह न जमणे ही एक सामाजिक समस्या म्हणून पुढे येत आहे.
आम्र, विवाह हे एक सामाजिक बंधन आहे. समाजव्यवस्था आणि कुटुंब व्यवस्था टिकवण्यासाठी विवाहाचे महत्य आहे. कुटुंब व्यवस्था टिकवण्यासाठी आणि बाढवण्यासाठी विवाह ही एक कायदेशीर पद्धती आहे. विवाहात फक्त एका स्त्री आणि पुरुषाच्या संबंध जोडला जात नसून त्यांच्यासोबत त्यांच्या कुटुंबाची आणि नातलगांचे देखील संबंध जोडले जात असल्याने विवाहाला एक सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. असं जरी असलं तरी विवाह जमणे आणि तो टिकवणे एक तारेवरची कसरत आहे. विवाह जमवताना अनंत अडचणी येतात. दिवाळीनंतर तुलशी विवाह पर्व संपला तरी पण लार समारंभ सुरुवातीचे मुहूर्त असुन सुध्दा सोयगाव शहरासह सावळदबारा ग्रामीण भागात व परिसरात सध्या लग्न जुळविण्याचा हंगाम सुरु आहे. सर्वत्र साखरपुडा, लन जमविणे व जमविलेल्या लग्रांचा बार उडविण्याचे काम काहि प्रमाणात सुरु आहे. परंतु मुलीचे प्रमाण हजारांच्या मागे सातशे असे झाल्याने ग्रामीण भागातील उपवर तरुणाला मुलगी मिळेनाशी झाली आहे. काही वर्षापासून मुलीच्या जन्मदात घट झाली आहे त्याचा परिणाम आता सोसावा लागत आहे. आता मुलींचे वय अठरा ते वीस वर्ष वय होईपर्यंत मुली संगणक, शिलाईकाम, ब्यूटीपार्लर असे कोर्स पूर्ण करुन स्वतःच्या पायावर उभे राहुन रोजगार उपलब्ध करत आहेत. काही मूली तर बी. एड, डी.एड. डॉक्टर, इंजीनियर, वकील, पीआय, पोलीस यांच्यासह पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेवून त्या नौकरी करतांना दिसतात तर काही महिलांनी मोठ्या पदाच्या नोकऱ्या मिळविल्या आहेत. मुलीच्या घटत्या जन्मदराने आता हुंडा नको मामा फक्त पोरगी द्या मला अशी विनवणी करण्याची वेळ मुलावर आली आहे. एकतर मोठ्या प्रमाणात झालेली भ्रूणहत्या व गतिमान होत चाललेली शिक्षण प्रमाणात ग्रामीण भागातील मुलाला लग्रनं जमवितांना अडचणी येत असल्याचे चित्र आहे. यामुळे लग्रांविना राहण्याची वेळ त्या तरुणावर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मुलगी बघायला गेलेल्या मुलाचा बाप दबक्या आवाजात आपल्याला हुंडा नको फक्त मुलगी हवी असे मध्यस्थी माणसांना सांगताना दिसत आहे. ग्रामीण भागातील मुलगी सुद्धा लग्राची घाई न करता शिक्षणाकडे लक्ष केंद्रीत करताना दिसत आहे. बहुसंख्य व्यसनाधीन तरुणांना मुलींनी नाकारल्याने नापसंत करण्याचे प्रकार वाढले आहेत.



# कारवा जंगलात दोघांना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**प्रेम गहलोत**

**बल्लारपूर :** तालुक्यातील कारवा वनपरिक्षेत्रात सध्या बिब्बट व वाघाचा धुमाकूळ सुरू आहे. कारवा जंगलात सरपण वेचण्यासाठी गेलेल्या इसमाचा नरभक्षी वाघाने बळी घेतला तर बिबट्याने बल्लारपूर शहरात घुसून एका चिमुकलीवर हल्ला चढवत गंभीर जखमी केले. तसेच वाघाने आता पर्यंत तिघांचा बळी घेतले आहे. यामुळे बल्लारशाह वनविभागाने वाघाला जेरबंद करण्यासाठी मोहीम उघडली असता रविवार १७ मार्चला दोन इसम दुपारी ३.३० वाजता कारवा राखीव वनखंड क्र. ४९३ जंगलामध्ये संशयास्पद स्थिती लाईव्ह कॅमेऱ्यामध्ये दिसले. त्यांची झडती घेतली असता त्यांच्या जवळ ज्वलनशील साहित्य आढळून आले यावरून जंगलात आग लावण्याचा हेतू व वाघ जेरबंद करण्याच्या मोहिमेत अडथळा आणल्याच्या कारणावरून दोघांना वनकायद्यानुसार अटक करण्यात आली.

बल्लारपूर शहराला लागून असलेल्या कारवा नियतक्षेत्रातील जंगलात दोन इसम संशयास्पद स्थितीत फिरत असल्याचे लाईव्ह कॅमेऱ्यात दिसून आले. त्यांना कारवा सफारी गेटजवळ थांबवून झडती घेतली असता त्यांच्या जवळ ज्वलनशील साहित्य आढळून आले. यामुळे जंगलात आग लावण्याचा हेतू व वाघ जेरबंद मोहिमेत अडथळा करण्याच्या कारणावरून आरोपी चंदन वासुदेव तिलोकानी (३६) रा. महात्मा गांधी वार्ड बल्लारपूर व सारंग शैलेश राहुलगडे (२३) रा. साईबाबा वार्ड, बल्लारपूर यांच्या विरुद्ध भारतीय वनअधिनियम १९२७ कलम २६ (१) ब, ड नुसार गुन्हा नोंदवून त्यांच्या जवळ असलेले ज्वलनशील साहित्य, मोबाईल व दुचाकी जप्त करून कारवाई करण्यात आली.

सदर प्रकरणाचा पुढील तपास मध्य चांदा वन विभाग चंद्रपूरचे उपवनसंरक्षक स्वेता बोड्डू व सहा. वनसंरक्षक आदेशकुमार शेडगे यांच्या मार्गदर्शनात वनपरिक्षेत्र अधिकारी बल्लारशाह नरेश भोवरे हे करीत असून क्षेत्र सहाय्यक ए. एस. पठाण, व्ही. पी. रामटेके, बी. टी. पुरी, वनरक्षक सुधीर बोकडे, तानाजी कामले, परमेश्वर आनकाडे, रंजीत दुर्योधन, वैशाली जेनेकर, माया पवार, सुनील नन्नावरे, मनोहर धाईत, धर्मेंद्र मेश्राम व एस.आर. देशमुख आदींचे सहकार्य लाभले

# वाशी येथील वनस्पतीशास्त्र विभागाची सुदर्शन ॲग्रो फार्मला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** जिल्ह्यातील -कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी येथील वनस्पतीशास्त्र विभाग, प्राणिशास्त्र व ग्रीन क्लब फॅक्टरी यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन शैक्षणिक धोरणानुसार या विभागात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मौजे पार्डी येथील सुदर्शन ॲग्रो फार्म,स्वराज ट्रेडर्स, सुदर्शन पोल्ट्री फार्म शेततळे व आंब्याची फळबाग येथे भेट देऊन व्यावसायिक क्षेत्रात अनेक संधी आहेत स्वतःला आत्मसात करून स्वतः चा पायावर उभे कसे राहता येईल याचा अनुभव असावा म्हणून एक दिवसीय सहल आयोजित करण्यात आली होती. प्राचार्य डॉ.अरुण गंभीरे यांनी सहलीसाठी शुभेछ्या दिल्या. या सहली मध्ये विज्ञान विभागाचे एकूण ४२ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांनी तेथील सर्व विभागांना भेटी देऊन माहिती करून घेतली आपण सुद्धा व्यावसायिक व संभाषण कौशल्य आत्मसात करून स्वतःच्या परिसरात विविध व्यवसाय चालू करून अनेक तरुणांना नोकरी देऊ असा आत्मविश्वास विद्यार्थांनी बोलून दाखवला. ज्यांच्या फार्म ला भेट दिली असे उद्योजक मा.विठ्ठलराव चौधरी यांनी पूर्व इतिहास सांगून व्यवसायाबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष नितीन चेडे, बाळासाहेब कवडे,प्रतापराव जाधव, प्रा.शाम डोके, प्रा.विलास गरड, प्रा.डॉ क्षीरसागर, प्रा. डॉ गुरमे, प्रा.डॉ कांबळे, प्रा.डॉ जाधव मॅडम, प्रा.डॉ देसाई सर, मुकुंद कोळी, उपस्थित होते.याप्रसंगी विद्यार्थांनी अनेक प्रश्न विचारून शंकेचे निरासन करून घेतले. प्रा.विश्वास चौधरी यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.




# आधुनिक युगात विद्यार्थ्यांनी प्रभावी व्यक्तीमत्व निर्माण करावे : प्रा. महेंद्र कुंभारे

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** चिंतामणी शिक्षण प्रसारक मंडळ बल्लारपूर द्वारा संचालित चिंतामणी महाविद्यालय, घुघुस. जि. चंद्रपूर येथे दिनांक 19/03/2024 रोज मंगळवारला सकाळी 10.00 वाजता समाजशास्त्र विभागाच्या अंतर्गत "एकदिवसीय व्यक्तिमत्व विकास चर्चासत्राचे" आयोजन करण्यात आले. या एकदिवसीय व्यक्तिमत्व विकास चर्चासत्राचे अध्यक्ष मराठी विभाग प्रमुख डॉ. माधव कांडणगिरे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नितीन कावडकर, तसेच ग्रंथपाल प्रा. मंगेश जमदाडे हे उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे आयोजक समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. महेंद्र कुंभारे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. माधव कांडणगिरे यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होणे अतिशय महत्वाचा असून विद्यार्थ्यांनी आपल्या भावी आयुष्यामध्ये महत्त्वपूर्ण असे व्यक्तिमत्व घडवावे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे डॉ. नितिन कावडकर यांनी एक दिवसीय व्यक्तिमत्व विकास चर्चासत्रात विद्यार्थ्यांनी आपल्या हिताची प्रगती साधावी असे सांगितले. प्रमुख पाहुणे प्रा. मंगेश जमदाडे यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वातून करियर घडवावे आणि महाविद्यालयाचे नाव उंचवावे असे सांगितले. कार्यक्रमाची प्रास्ताविक समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. महेंद्र कुंभारे यांनी एकदिवसीय व्यक्तिमत्व विकास चर्चासत्राची पार्श्वभूमी स्पष्ट करून विद्यार्थ्यांनी आपले व्यक्तिमत्व कसे विकसित करावे आणि आपले प्रभावी जीवन कसे जगावे असे प्रतिपादित केले. कार्यक्रमाची सूत्रसंचालन कु. संजना वाढई यांनी केले. तर आभार प्रदर्शन किरण कोयाचाले यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्रा. संतोष गोहोकर, प्रा. गणेश सुरजुसे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम करून मोलाचे सहकार्य केले.

# नाथषष्टीला वीस क्विंटल पुरी भाजीचा बेत

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** 31 मार्चपासून 2 एप्रिलपर्यंत पैठण येथे संत एकनाथ महाराज षष्ठी सोहळा असलेल्या पैठण शहरात न.प. प्रशासनाने स्वच्छता, तसेच वारकऱ्यांना विविध सुविधा देण्यासाठी कामाची लगबग शहरात सुरू झाली असुन त्यानिमित्ताने वारकऱ्यांना पाणी, नाष्टा, भोजन अशा सुविधा नागरिक देतात. त्यापैकी एक गेल्या सहा वर्षापासून पैठण शहरातील कमानी शेजारील पाटील कॉम्प्लेक्समधील कृषीजगत परिवार एकत्र येत नाथषष्टी यात्रा काळात लाखो वारकऱ्यांना तीन दिवस पुरी भाजीचे भरपेट भोजन देतात यंदा यात वाढ करण्यात आली आसुन जवळपास विस क्विंटलची पुरी भाजी करण्यात येणार असल्याची माहिती कृषी जगत परिवारा तर्फे रामेश्वर सुसे यांनी सांगितले असुन पैठण येथे संत एकनाथ महाराज षष्ठी सोहळ्यासाठी येणाऱ्या भाविकांनी शहरातील पाटील प्लाझा कमानी जवळील कॉम्प्लेक्स या ठिकाणी पोटभर भोजनाचा लाभ घेण्याचे अवाहन करण्यात आले. यासाठी कृषीजगत परिवार यांचासह शेतकरी,पाटील प्लाझातील दुकानदार, कृषी कंपनीचे मित्र यांच्या सहकार्याने नाथषष्टी सोहळ्यात पुरी भाजीच्या माध्यमातून आन्नदान केले जाते. नाथषष्टी काळातील तीन दिवस पुरी भाजीच्या स्वरूपातील हे सर्वात मोठे आन्नदान आसुन याठिकाणी आलेल्या वारकरी भाविकांना जेवणासह पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात येते. याकामी जे अन्नदान स्वरूपी मदत करतात तेच नागरीक ईथे तीन दिवस वारकरी भाविकांना पंगत वाढण्याची सेवा देतात.



# लोणंद येथे महिला सक्षमीकरण कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** देसाई फूड्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सी.एस.आर फंडच्या माध्यमातून आणि नाफारी संस्था पुणे,युगंधरा बहुउद्देशीय सामाजिक संस्था सातारा,गर्जे मराठी ग्लोबल,कॅलिफोर्निया यांच्या संयुक्त विद्यमाने लोणंद (ता. खंडाळा)येथील पंचशील बुद्धविहारात महिला सक्षमीकरण आणि सबलीकरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिलांनी या कार्यक्रमास उपस्थित राहत विविध व्यवसाय आणि विविध योजनांची माहिती जाणून घेतली. आर्थिक दुर्बल घटकातील महिलांना उदयोग मार्गदर्शन पॅकेजिंग,लेबलिंग,फूड सेफ्टी,मार्केटिंग,ब्रँडिंग यांसह प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उदयोग योजना या संदर्भात तसेच रोजगार निर्मिती बाबतचे विशेष मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी प्रोजेक्टर वर माहिती समजावून सांगितली. महिलांनी सुद्धा विविध प्रश्न विचारीत संवाद साधला.या कार्यक्रम शुभारंभ प्रसंगी लोणंद नगरीच्या नगराध्यक्षा सीमा खरात,माजी नगरसेविका शैलजा खरात,इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा डॉ.स्वाती शहा,रजनीताई शिंदे आदीं सह इतर मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रम प्रसंगी लोणंद नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सीमा खरात, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा डॉ.स्वाती शहा,माजी नगरसेविका शैलजा खरात आणि सुषमाराजे घोरपडे ह्यांनी महिलांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम प्रसंगी महिलांचे आधार कार्ड आणि रेशन कार्ड घेऊन महिलांची नोंदणी करण्यात आली. १५० रुपये नोंदणी फी आकारण्यात आली. प्रशिक्षण देणे हा नाफारी संस्था पुणेचा यांचा महत्वाचा भाग असून आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांकरिता हे प्रशिक्षण देण्याचे कार्य या संस्थेच्या वतीने पार पाडले जाते.हे आयोजन करण्यासाठी युगंधरा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा सुषमा राजे घोरपडे, गर्जे मराठी ग्लोबलचे सर्जेराव पाटील,प्राची ताकतोडे,नाफारी संस्था पुणेचे अकाऊंटंट पराग भापकर,टेस्टिंग हेड श्रीरंग पोखरकर,ट्रेनिंग मॅनेजर तेजश्री लोकरे, ट्रेनिंग हेड संतोष देवकाते, कन्सलटन्सी समन्वयक प्रतीक्षा भोसले, माजी नगरसेविका शैलजा खरात,पौर्णिमा खरात, शारदा भस्मे, नूतन गायकवाड,नीलम शेळके, रेश्मा खरात, पूजा खरात, रजिया इनामदार आदींनी विशेष मेहनत घेतली.युगंधरा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा सुषमा राजे घोरपडे म्हणाल्या की,महिला बचत गट,वैयक्तिक महिला व्यवसायिक तसेच ज्या महिलांना घरगुती काम हवं आहे.अशा सर्व महिलांचं एकत्रितपणे ट्रेनिंग आयोजित केलेले आहे.महिला सक्षमीकरण करत असताना महिलांची आर्थिकता प्रबळ करण्याच्या दृष्टीने या ध्येयाने हा कार्यक्रम घेण्यात आलेला आहे. ट्रेनिंग हेड देवकाते म्हणाले की, आमच्या संस्थेच्या माध्यमातून वेगवेगळे ट्रेनिंग प्रोग्रॅम्स, प्रॉडक्ट्स टेस्टिंग,कन्सलटेशन या तीन माध्यमातून आम्ही सर्वांत जास्त सर्विस देत असतो.

# आदर्श आचारसंहितेचे पालन होण्यासाठी विविध बाबींवर निर्बंध : जिल्हाधिकारी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक – 2024 च्या अनुषंगाने चंद्रपूर जिल्ह्यातील संपूर्ण कार्यक्षेत्रात आदर्श आचारसंहितेचा भंग होऊ नये तसेच तसेच आचारसंहितेचे यथायोग्य पालन होण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून जिल्हादंडाधिकारी विनय गौडा यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 (1974 चे 2) कलम 144 मधील तरतुदीनुसार निर्बंध लागू केले आहेत. त्यानुसार शासकीय कार्यालये / विश्रामगृहे इत्यादी परिसरात मिरवणुका काढण्यास, घोषणा देणे / सभा घेणे इत्यादीवर निर्बंध राहतील. शासकीय / निमशासकीय सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात विद्रुपीकरण करण्यास निर्बंध करण्यात आले आहे. उमेदवारांचे नामनिर्देशन दाखल करतेवेळी ताफ्यामध्ये तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या / वाहने तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या 100 मीटर परिसरात व दालनात 5 व्यक्ती व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश करण्यास निर्बंध राहतील. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उमेदवाराचे नाव व चिन्ह वापरणे, आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे, तसेच निश्चित केलेल्या कागदाच्या आकाराप्रमाणे नमुना मतपत्रिका छपाईस निर्बंध आहेत. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत व्यक्तिंची मते किंवा कृत्ये याविरुध्द निषेध व्यक्त करण्यासाठी त्यांच्या घरासमोर तसेच सार्वजनिक रहदारी / वर्दळीच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध राहतील. धार्मिक स्थळे, रुग्णालये, किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणाच्या जवळपास तात्पुरते पक्ष कार्यालय स्थापन करण्यास निर्बंध आहेत. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जाती, जमाती यांच्यातील किंवा धार्मिक वा भाषिक गटातील मतभेद अधिक तीव्र होतील किंवा त्यांच्यात तणाव निर्माण होईल, अशी कोणतीही कृती करण्यास निर्बंध आहेत. निवडणुकीच्या प्रचाराकरीता निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनावर पक्ष प्रचाराचे कापडी फलक, झेंडे लावणे इत्यादी बाबींवर निर्बंध राहतील. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सार्वजनिक जागेवर / खाजगी व्यक्तिच्या जागेवर झेंडे, भित्तीपत्रके जागा मालकाच्या व संबंधित प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय लावण्यास निर्बंध आहेत. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत प्रचार / रॅली / रोड-शो याकरीता वाहनाच्या ताफ्यात सलग 10 पेक्षा अधिक मोटार गाड्या / वाहने वापरण्यास निर्बंध राहतील. सदर आदेश जिल्हादंडाधिकारी विनय गौडा यांच्या स्वाक्षरीने आणि कोर्टाच्या शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आले आहे.

# नागपूरच्या मेट्रो स्थानकावर सुरक्षा रक्षकाला मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मटण सोबत घेऊन मेट्रोने जाण्यासाठी स्थानकावर आलेल्या प्रवाशाला सुरक्षारक्षकाने रोखल्याने संतापलेल्या प्रवाशाने मित्रांच्या मदतीने सुरक्षारक्षकालाच बेदम मारहाण केली. ही घटना अग्रसेन मेट्रो स्थानकावर घडली. त्याची तक्रार गणेशपेठ पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागपूर मेट्रो रेल कंत्राटी कर्मचारी संघाने पोलीस व महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्याकडे केली आहे. मेट्रोने प्रवास करताना काही वस्तू प्रतिबंधित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांकडे असलेल्या वस्तूंची सुरक्षा रक्षकाकडून तपासणी केली जाते. १५ मार्च रोजी अग्रसेन मेट्रो स्थानकावर एक व्यक्ती मटण घेऊन जात असताना सुरक्षारक्षक जयनारायण कुथे यांनी त्याला रोखले.

# मुनगंटीवार यांनी फोडला प्रचाराचा नारळ, धानोरकर वडेट्टीवार वादात देवतळे, बांगडेंची उडी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 13 मार्च रोजी मुनगंटीवार यांची लोकसभेची उमेदवारी जाहीर करून भारतीय जनता पार्टीने पहिल्या टप्प्यातील निवडणुकीच्या दृष्टीने आपले पहिले पाऊल टाकले व काल दिनांक १८ मार्च रोजी सुधीर मुनगंटीवार यांनी स्थानिक गांधी चौक येथे आयोजित आशीर्वचन सभेमध्ये आपल्या प्रचाराचा नारळ फोडला . तर काँग्रेसमध्ये मात्र अजूनही उमेदवार निश्चितीची प्रक्रिया गोंधळात गोंधळ घालणारी ठरलेली आहे.

चंद्रपूर वणी आर्णी  लोकसभा 2024 च्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीने उमेदवार निश्चिती व प्रचाराचा नारळ फोडण्यात आघाडी घेतली आहे. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर सुधीर मुनगंटीवार यांच्या चंद्रपूर नगरीत प्रथम आगमना प्रित्यर्थ भारतीय जनता पार्टीच्या वतीने आशीर्वचन सभेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यकर्त्यांमध्ये असलेला प्रचंड उत्साह, ठिकठिकाणी झालेले भव्य स्वागत आणि या स्वागताला उत्तर देताना मुनगंटीवार यांनी विकास कामातूनच जनतेच्या प्रेमाच व्याज फेडण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करेल व राज्याप्रमाणेच केंद्रातील विविध योजनांचा उपयोग आपल्या लोकसभा क्षेत्रातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचण्यासाठी मी प्रयत्नशील राहील असा विश्वास देत विविध समाजातील धर्मगुरूंच्या साक्षीने




मतपेरणी करण्यास त्यांनी सुरुवात केली . तर दुसरीकडे मात्र काँग्रेस पक्षामध्ये धानोरकर आणि वडेट्टीवार यांच्या वादात आता तेली समाजातील विनायक बांगडे आणि प्रकाश देवतळे या दोन नेत्यांनी उडी घेतल्याने दिल्लीतील गोंधळ आणखीन वाढलेला आहे.


दोन दिवसात पक्षाने आपला उमेदवार जाहीर करावा अन्यथा आम्हाला वेगळी भूमिका घ्यावी लागेल असा विषय घेऊन तेली समाजातील विनायक बांगडे व प्रकाश देवतळे यांनी आपल्या समाज बांधवांची सभा घेत काँग्रेसला घरचा आहेर दिला आहे .











2019 मध्ये काँग्रेस पक्षातर्फे तेली समाजातील ज्येष्ठ नेते विनायक बांगडे यांना उमेदवारी निश्चित झालेली होती . परंतु , ऐनवेळी सुरेश उर्फ बाळू धानोरकर यांनी शिवसेनेतून काँग्रेस पक्षात प्रवेश करत काँग्रेसची उमेदवारी मिळवून आपला विजय संपादन केलेला होता .




त्यामुळे तेव्हा पासूनच तेली समाज हा काँग्रेस पासून दुखावल्या गेला होता . तेव्हापासून असलेली ही दुखरी नस प्रकाश दळतळे यांच्या नेतृत्वात आता पुन्हा एकदा नव्याने काँग्रेस समोर डोकेदुखी ठरू लागलेली आहे.

काँग्रेसच्या नैसर्गिक नियमाप्रमाणे काँग्रेसचे दिवंगत खासदार बाळू धानोरकर यांच्या पत्नी आमदार श्रीमती प्रतिभा धानोरकर यांना ही जागा मिळावी यासाठी संपूर्ण काँग्रेस आपल्या पाठीशी उभी करण्यात अपयश आल्याचे दिसून येत आहे.  शिवानी वडेट्टीवार यांचे नाव पुढे करून वडेट्टीवार यांनी धानोरकरांच्या उमेदवारी मध्ये खीळ टाकली. धानोरकर वडेट्टीवार हा वाद सर्वश्रुत असतानाच उमेदवारीच्या नावामध्ये ओबीसी चेहरा म्हणून  सुभाष धोटे यांचे नाव समोर यायला लागले . सुभाष धोटे यांचे नाव समोर येताच प्रकाश देवतळे यांना तेली बांधवांवर झालेल्या अन्यायाची आठवण झाली . आणि त्यांनी थेट आपल्या समाज बांधवांची सभा घेत या बैठकीमध्ये काँग्रेसने दोन दिवसात उमेदवार जाहीर करावा अथवा आम्हाला वेगळा निर्णय घ्यावा लागेल असा इशारा काँग्रेसला दिलेला आहे . तर दुसऱ्या बाजूला चंद्रपूर शहर जिल्हा अध्यक्ष रितेश तिवारी यांनी त्यांच्या समाज माध्यमावर काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आधी जिल्हा परिषद , नगर परिषद , स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवाव्यात व नंतरच लोकसभेची उमेदवारी मागावी असे म्हणत थेट शिवानी वडेट्टीवार यांच्या उमेदवारीवर आक्षेप नोंदविल्याचे दिसते आहे . अशा पद्धतीने काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या अंतर्गत लथाळ्यांमुळे अजूनही दिल्ली दरबारी हाय कमांड द्वारे चंद्रपूरच्या लोकसभेच्या उमेदवारी बाबत कुठलाच निर्णय अजून पर्यंत घेण्यात आलेला नाही. तर दुसऱ्या बाजूला भारतीय जनता पार्टीने मात्र कालच्या आशीर्वचन सभेमध्ये आपल्या प्रचाराचा नारळ फोडत सुधीर मुनगंटीवार यांच्या विजयी वाटचालीच्या दिशेने जोरदार तयारी केल्याचे दिसत आहे.



# निवडणुकीने तापलेल्या चंद्रपुरात मेघगर्जनेसह जोरदार पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्हा म्हटला की उन्हाळ्यासाठी प्रसिद्ध . त्यात मार्च महिना म्हटला की पारा 40 वर 42 अंशावर गेलेला . शिवाय आता निवडणूक जाहीर झाल्यापासून सर्वच पक्षात वातावरण चांगलंच तापलेलं आहे . त्यात  कालपासून चंद्रपूरचे वातावरण थोडसं ढगाळलेल होतं . आज सकाळी सुदधा  ढगाळलेल्या वातावरणा चा परिणाम जाणवत होताच . परंतु दुपारी दोन वाजताच्या सुमारास अचानक आभाळ भरून आले आणि पाहता पाहता मेघगर्जनेसह जोरदार पावसाची सुरुवात झाली. अचानक आलेल्या या पावसाने चंद्रपुरातलं वातावरण एकदम थंडगार झालेलं असलं तरी या पावसाचा शेतकऱ्यांना मात्र जोरदार फटका  बसलेला आहे.

हाता तोंडाशी आलेला गहू शेतकऱ्यांच्या हातून जातो की काय अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे . शेतकऱ्यांसाठी हा अवकाळी पडलेला पाऊस हाच तोंडाशी आलेला घास हीसकावणारा ठरला आहे. तर मनच महिन्यात अचानक निर्माण झालेल्या गारव्याने चंद्रपूरकर मात्र या पावसाचा आणि गारव्याचाही आनंद घेत आहेत. कामानिमित्य घराबाहेर पडलेल्यांची मात्र या पावसाने चांगलीच तारांबळ उडालेली दिसत होती. बातमी लिहेपर्यंत पावसाने आपले कोसळणे सुरूच ठेवले होते.

# व्यापारी संकुलातील गाळा हडपला; पत्रकार परिषदेत लोंढेंची कैफियत

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील साक्रीरोडवरील मोती नाल्यानजीक असलेल्या झगाशेठ लोंढे शॉपिंग कॉम्प्लेक्समधील  गाळा सोनल दिलीप शिंदे यांनी हडपला असून यंत्रणा अत्यंत धिम्या गतीने काम करीत असल्याने यंत्रणेचे लक्ष वेधण्यासाठी लाक्षणिक उपोषण करणार असल्याची माहिती गाळा मालक गुलाबराव झगाशेठ लोंढे यांनी पत्रकार परिषदेत दिली.धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात घेतलेल्या पत्रकार परिषदेत लोंढे म्हणाले की, झगाशेठ लोंढे व्यापारी संकुलात ८ गाळे काढण्यात आले आहे. त्यातील सहा नंबरचा गाळा हा माझ्या स्वमालकीचा आहे. बांधकाम विभागातील तत्कालीन अधिकारी पाटोळे यांनी पाच नंबरचा गाळा विकत घेतला. परंतु त्याचे काम सुरु असल्याने गुडफेथ मध्ये सहा नंबरचा गाळा त्यांना वापरायला दिला.त्यानंतर त्यांनी गाळा सोनल दिलीप शिंदे यांना विकला. सोनल शिंदेंनी पाच,सहा आणि सात नंबरचा गाळा ताब्यात घेतला.कागद पत्रांमध्ये फेरफार केली. सहा नंबरचा गाळा नसल्याचे कागदपत्र तयार केले. सध्या माझ्या या सहानंबरच्या गाळात प्रिंन्स वाईन शॉप हे बेकायदेशिररित्या सुरु आहे. माझ्या मालकीच्या या दुकानातील दारु विक्री प्रशासनाने बंद करावी. २०१५ पासून राज्य उत्पादन शुल्कसह मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्वत्र तक्रारी केल्या. परंतु कारवाई अत्यंत धिम्या गतीने सुरु आहे. प्रशासनाने कारवाई वेग द्यावा यासाठी मी लाक्षणिक उपोषण करणार असल्याचे गुलाबराव लोंढे यांनी सांगितले.




# बोट क्लब, पुणे येथे रोटरी मल्टी डिस्ट्रिक्ट ब्रांडिंग सेमिनार संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** रोटरी क्लब डिस्ट्रिक्ट 3131 द्वारा  पुणे येथील बोट क्लब च्या पोचा हॉल मधे मल्टी डिस्ट्रिक्ट ब्रांडिंग सेमिनार चा भव्य असा आयोजन करण्यात आला. विभिन्न जिल्ह्यातील 250 रोटेरियन सभासदांनी या सेमिनार मधे सहभाग घेतला. या समारोहात उपस्थित सर्व वक्तांना रोटरी व्यावसायिक उत्कृष्टता पुरस्कार ने गौरविण्यात आले.

या प्रसंगी आप आपल्या रोटरी जिल्ह्यातून दैनिकांच्या व रोटरी च्या माध्यमातून मेरा शहर मेरा वचन या प्रोजेक्ट अंतर्गत विशेषता पानी व ट्रैफिकच्या समस्यांच्या निवारण करिता वृत्तपत्रांच्या संपादकांच्या सह्याने त्यांना रोटरी सोबत काम करण्याचे आव्हान करुन नागरिकांच्या मदतीने सुरक्षा व जागृती करण्याचा संकल्प करण्यात आला.

सध्याच्या युगात कम्यूनिकेशन टूल्स चा उपयोग समाज प्रबोधन जन जागृती व सर्वच जनहिताच्या



कार्य करीता कसा करता येईल याचा उदाहरण देण्याकामी उदाहरणपर शॉर्ट फिल्म दाखवण्यात आली. रोटरी क्लब अंतर्गत घेण्यात येणाऱ्या समाजुपयोगी प्रोजेक्टचे विवरण व कार्य हे नवीनता ने कमी शब्दात रिपोर्टिंग कशी करावी याबाबत ची माहिती संपादक पराग करंदीकर यांनी दिली. सेतु विज्ञापन चे ऋग्वेद देशपांडे यांनी देखील समाज सेवा करताना त्याचा प्रचार प्रसार करू नये या जुन्या म्हणीला फाटा देत आपण करत असलेले सदकार्य हे लोकांपर्यंत पोहचवावे असे आवर्जुज सांगत त्यामाध्यमातून इतर लोकांना सदकार्य व समज सेवा करण्याची प्रेरणा मिळावी अशा रीतीने त्याचा प्रचार प्रसार करावा असे सांगितले. या वेळी बोलताना चितळे ब्रांडचा कार्य क्षेत्र कसा वाढला व समाजिक कार्यात परिवाराचे योगदान यावर चितळे समूहाचे गिरीश चितळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. रोटरी 3030, 3131, 3132, 3170 पुरस्कृत या संयुक्तिक मल्टी डिस्ट्रिक्ट ब्रांडिंग सेमिनार मधे आप आपल्या व्यवसायात अगर कोणत्याही आस्थापना, संस्था मधे आधुनिक युगात ब्रँडिंग चा महत्त्व व आपल्या लोगोच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचून समर्पक व व्यापक ब्रॅंडिंग कशा पध्दतीने करावी व त्याचा मोठा फायदा कसा मिळवता येईल या उद्देशाने या सेमिनार चे आयोजन सर्व रोटरी डिस्ट्रिक्ट च्या प्रांतपाल यांच्या मार्गदर्शनाखाली तर सर्व पब्लिक इमेजचे डिस्ट्रिक्ट डायरेक्टर यांच्या पुढाकारातून घेण्यात आले. यावेळी चारही जिल्ह्यातील विशेषता रोटरी ची पब्लिक इमेज आढवण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेल्या विविध प्रोजेक्ट्स मधून जिल्हा स्तरीय बक्षिसे जाहीर करण्यात आली होती. यात निगड़ी क्लबला ऑनलाइन आई डोनेशन प्रतिज्ञा प्रोजेक्ट ट्रांसोसेनिया वर्ल्ड रिकॉर्ड ऑर्गनाइजेशन च्या अंतर्गत इनोवेशन इन रोटरी अवार्ड, डिस्ट्रिक्ट 3030 नाशिक च्या मालेगांव क्लबला फ्री आई कॅंप, डोळे तपासण्याचे शिबिर घेऊन त्यांचे ऑपरेशन, गरजवतांना ना आई डोनेशन हे सर्व कार्य मागील 15 वर्षांपासून करत असल्याने, डिस्ट्रिक्ट 3170 इचलकरंजी च्या टेक्सटाइल सिटी क्लब ला  जयपुर फुट मधे विशेष कार्य केल्याबद्दल रिजल्ट इन रोटरी अवार्ड तथा डिस्ट्रिक्ट 3132 च्या रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल ला रोटरी ट्रेड फेयर या प्रोजेक्ट अंतर्गत जिलास्तरीय शॉपिंग फेस्टिवल चा आयोजन करत सर्वाधिक फूटफॉल मिळवल्याबद्दल रोटरी इनिशिएटिव अवार्ड फूटफॉल बीकॉन अवार्ड ने सन्मानित करण्यात आले. यावेळी नगर येथून रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे पब्लिक इमेज डायरेक्टर रो. अभय राजे, रोटरी सेंट्रल चे पब्लिक इमेज डायरेक्टर व डिस्ट्रिक्ट ३१३२ चे यूथ सर्व्हिसेस चे डिस्ट्रिक्ट डायरेक्टर रो. ईश्वर बोरा, सेंट्रलचे अध्यक्ष हरिश नय्यर, सचिव कुणाल कोल्हे, फर्स्ट लेडी डॉ प्रीती नय्यर, डॉ कीर्ती कोल्हे, चेतन अमरापुरकर, तेजश्री अमरापुरकर, प्रियदर्शिनी च्या प्रेसिडेंट इलेक्ट रो. मीनल बोरा, डिग्निटी च्या सचिव उज्ज्वला राजे आदि उपस्थित होते.

# सेवा, गुणवत्तेमुळे गाडीलकर ठरले पुरस्कारांचे मानकरी

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीकांत चौरे**

**पारनेर :** गेले अठरा वर्षापासून नगर पुणे महामार्गावरील सुपा टोलनाक्या नजदीक असणाऱ्या म्हसणे फाटा येथील भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि.चे श्री समर्थ मल्टी सर्विसेस या कंपनी नियंत्रित पेट्रोल पंपाची गुणवत्ता व सेवेच्या माध्यमातून नेहमी उत्तम चर्चा होत आली आहे.सदर पंपाचे चालक कैलास गाडीलकर सर हे उच्चशिक्षीत असून या पेट्रोलियम क्षेत्रातील त्यांचा दीर्घ अनुभव व गुणवत्ता जपण्याची हातोटी यामुळे श्री.गाडीलकर यांची संपूर्ण राज्यभर चर्चा आहे.

मंगळवार दिनांक 12 मार्च रोजी पुणे येथील जे.डब्ल्यू मेरीयट या पंचतारांकित हॉटेलमध्ये दिमाखदार सोहळ्यात भारत पेट्रोलियम चे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर (रिटेल) संतोष कुमार,स्टेट हेड रिटेल राकेश कुमार सिन्हा तसेच जनरल मॅनेजर शुभंकर सेन यांच्या शुभहस्ते तसेच अहमदनगर टेरिटोरीचे मॅनेजर सुधीर कनाला, टेरिटोरी कोऑर्डिनेटर कीर्तीकुमार सिंधानी, अमित कुमार राय श्री.रविराज दास यांच्यासह भारत पेट्रोलियमच्या विविध अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत भारत पेट्रोलियम समुहात उल्लेखनीय कामगिरी करणारे किमान 500 पेट्रोल पंप चालक यांच्या प्रमुख उपस्थितीत , पेट्रोलियम क्षेत्रात कर्तुत्वाचा महामेरु ठरलेले व यापूर्वीही अनेक पुरस्काराने सन्मानित झालेले श्री समर्थ मल्टी सर्व्हिसेस संचालक, युवा उद्योजक श्री.कैलास गाडीलकर सर व सौ.शिल्पा गाडीलकर यांना महाराष्ट्र व गोवा या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात " टेरीटोरी चॅम्पियन " व " एच.एस.डी. चॅम्पियन " या पेट्रोलियम क्षेत्रात महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या दोन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

श्री समर्थ मल्टी सर्व्हिसेस या कंपनी नियंत्रित पंपाच्या माध्यमातून गेल्या अठरा वर्षापासून पेट्रोलियम क्षेत्रात कार्यरत असणारे या पेट्रोल पंपाचे संचालक कैलास गाडीलकर यांनी भारत पेट्रोलियमच्या माध्यमातून अनेक नव नवीन उपक्रम राबवत भारत पेट्रोल पंप क्षेत्रात कार्य करत आले आहेत.अहमदनगर जिल्ह्यात पहिलाच पेट्रोल / डिझेल पंपाच्या जोडीला सी.एन.जी.पंप



हा अहमदनगर जिल्ह्यातील पहिला पंप सुरु करण्यामध्ये त्यांना यश मिळाले आहे.सी.एन. जी. पंपाचा शुभारंभ त्या वेळेसचे तात्कालीन जिल्हाधिकारी श्री.राजेंद्र भोसले साहेब तसेच पारनेर नगर मतदार संघाचे राष्ट्रवादीचे आमदार निलेश लंके यांच्या सह भारत पेट्रोलियमच्या देशातील प्रमुख अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या सीएनजी पंपाचा शुभारंभ करण्यात आला होता.पेट्रोल व डिझेलचे वाढते दर लक्षात घेता भारत सरकारने सी.एन.जी.गॅस वर चालणारे अनेक वाहने बाजारात आनल्यामुळे त्यांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी सी.एन.जी. पंप अहमदनगर जिल्ह्यात सुरू करायचा निर्धार केला.व अल्पावधीतच त्या पंपाच्या माध्यमातून व डिझेल / पेट्रोल पंपाची गुणवत्ता व सेवेच्या योगदानामुळे श्री समर्थ मल्टी सर्विसेस या पंपाची दखल भारत पेट्रोलियमने घेत व त्यांच्या उत्कृष्ट सेवेमुळे या पुर्वीही लोणावळा येथे झालेल्या भव्यदिव्य कार्यक्रमात पारितोषिक वितरण समारंभात बी.पी.सी.एल. चे जनरल मॅनेजर (पश्चिम ) श्री. के.रवी साहेब

तसेच श्री.रमण मलिक ( महाराष्ट्र राज्य प्रमुख ) यांच्या शुभ हस्ते "सी.एन.जी.चॅम्प " महाराष्ट्र आणि गोवा राज्य या राज्यस्तरीय पुरस्काराने संचालक कैलास गाडिलकर यांना सन्मानित करण्यात आले होते.

पारनेर नगर विधानसभा मतदार संघाचे आमदार निलेश लंके यांच्या सह पारनेर तालुक्यातील सर्व क्षेत्रातील नेतेमंडळी,सामाजिक कार्यकर्ते व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पेट्रोलियम व्यवसायात दैदीप्यमान यश मिळवल्यामुळे,युवा उद्योजक,श्री समर्थ मल्टी सर्विसेसचे संचालक कैलास गाडीलकर यांचे अभिनंदन केले.



# कन्नड शहरासाठी ५० कोटींची पाणी पुरवठा योजना मंजूर : संजय खंबायते

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरातील नागरिकांसाठी ५० कोटी ३४ लाख रुपयांची पाणीपुरवठा योजना केंद्रीय अर्थराज्य मंत्री डॉ. भागवत कराड यांच्या प्रयत्नाने मंजुर झाल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी कन्नड त्यांच्या कार्यालयात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दि.१६ ला शनिवारी केली. पुढे बोलताना खंबायते म्हणाले कि, आतापर्यंत कुठल्याही विधानसभा सदस्याला ५ जास्तीत १० कोटीच्या वरती नाबार्ड अंतर्गत निधी दिला जात किंबहुना तो मिळालेला नाही. परंतु डॉ कराड यांच्या माध्यमातून आतापर्यंत कन्नड तालुक्यासाठी नाबार्ड अंतर्गत १३४ कोटी रुपयाचा निधी देण्यात आला आहे.

तालुक्यातील वाकी, जेहुर, कालीमठ, तेलवाडी, नेवपुर, ढवळेश्वर संस्थान देभेगाव या ब दर्जाचे तिर्थक्षेत्राला आतापर्यंत ११ कोटीचा निधी देण्यात आला. त्याच बरोबर २५/१५ योजने अंतर्गत देखील तालुक्यातील जे मोठ्या बाजारपेठेची गाव आहेत अशा मोठा गावातील गाव अंतर्गत रस्त्यासह विविध विकास कामासाठी १० कोटी निधी देण्यात आला. त्याचबरोबर नगरविकास खात्याच्या माध्यमातून कन्नड शहरातील पाणीप्रश्न सोडवण्यासाठी तब्बल ५० कोटी ३४ लाख रुपयांची सर्वात मोठी पाणीपुरवठा योजना मंजुर केली. हि अंबाडी मध्यम प्रकल्पातुन होणार आहे. त्याच बरोबर शहरातील अंतर्गत रस्त्यासाठी १ कोटी ५० लाख रुपये यापुर्वीच दिले आहे. विविध वार्डीतील रस्त्यासाठी ७ कोटी मंजुर केले. त्याच बरोबर ड्रेनेज साठी ७२ कोटीचा रुपयांचा निधी प्रस्तावित आहे. आता डॉ भागवत कराड यांच्या माध्यमातून कन्नड शहरासह तालुक्यासाठी अडीशे कोटी रुपयाचा निधी आतापर्यंत असल्याचे संजय खंबायते यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले. यावेळी कन्नड -सोयगाव विधानसभा प्रमुख डॉ. संजय गव्हाणे, तालुका अध्यक्ष किशोर पवार, शहर प्रमुख सुनील पवार उपस्थितीत होते.

# महिलांनो आपल्यातील कार्यातून कर्तृत्व सिद्ध करा : साधनाताई मुळे

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** नेवासाफाटा येथील स्वप्नील मेमोरियल फाऊंडेशनच्या वतीने नेवासा तालुक्यातील गेवराई येथे आयोजित महिलांच्या गौरव सोहळयाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.यावेळी कर्तृत्ववान महिलांचा सत्काराच्याद्वारे प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. स्त्री ही अबला नाही तर एक शक्ती असून महिलांनो आपल्यातील कार्यातून कर्तृत्व सिद्ध करण्याची तयारी ठेवा असे आवाहन हभप सौ.साधनाताई मुळे यांनी यावेळी बोलताना केले.

महिला दिनाचे औचित्य साधून गेवराई येथे नुकत्याच झालेल्या कार्यक्रम प्रसंगी गेवराईच्या सरपंच ॲड. सूर्यकांत लिपाणे, रमेश राऊत सर, दत्तात्रय शिरसाठ, संस्थेच्या उपाध्यक्षा मीनाताई औताडे, सचिव सविता रासकर, आनंद पानकडे यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.या प्रसंगी फाउंडेशनच्या सचिव सविता रासकर यांनी आलेल्या महिला भगिनींचे स्वागत केले तर स्वप्नील मेमोरियल फाऊंडेशनचे अध्यक्ष निलेश रासकर यांनी प्रास्ताविक करतांना संस्थेने केलेले कार्य व भविष्यात विविध योजनांद्वारे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची त्यांनी माहिती दिली.

यावेळी कायदे तज्ञ ॲड.सूर्यकांत लिपाणे यांनी कौटुंबिक हिंसाचार आणि त्यासाठी असलेले विविध कायदयांची माहिती त्यांनी दिली. अज्ञानामुळेच महिला आपल्या न्याय हक्कांपासून वंचित रहात असल्याने कायदेविषयक ज्ञान महिलांनी आत्मसात करण्याचे त्यांनी आवाहन केले.तर राऊत सरांनी समाजातील महिलांचे स्थान याविषयी आपल्या मार्मिक शब्दात वस्तुनिष्ठ विश्लेषण आपल्या भाषणातून केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा हभप सौ.साधनाताई मुळे यांनी रामायण व महाभारत मधील दाखले देत व महिलांच्या विविध पैलूंचे महत्व सांगताना उपस्थित महिलांना चांगलेच मंत्रमुग्ध केले.महिला ही अबला नाही तर एक शक्ती आहे,आपल्यातील कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी महिला हिमतीने पुढे आल्या तर क्रांती होऊ शकते त्यासाठी महिलांनो आपले कर्तुत्व सिद्ध करण्यासाठी पुढे या असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले. या प्रसंगी कु. गायत्री भालेकर, कु.खुशी गोरे,कु. गौरी भालेकर, कु. श्रावणी भालेकर यांनी नृत्य सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली त्यांना उपस्थित महिलांनी टाळयांची साथ देत प्रोत्साहित केले. महिला गौरव सोहळयाच्या निमित्ताने विविध स्पर्धा यावेळी महिलांसाठी आयोजित करण्यात आल्या होत्या. यातील यशस्वी स्पर्धकांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मीनाताई औताडे यांनी केले तर निलेश रासकर यांनी आभार मानले.



# करजगाव येथील रेशीम उद्योग प्रकल्पास सोनई येथील कृषिकन्यांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** ग्रामीण कृषी जागरुकता आणि कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत मुळा एज्युकेशन सोसायटीच्या कृषि महाविद्यालय सोनईच्या कृषी कन्यांनी प्रगतशील शेतकरी कैलास शिंदे यांच्या रेशीम उद्योग प्रकल्पाला भेट दिली. रेशीम शेती कशी करावी याबद्दल त्यांनी योग्य ते मार्गदर्शन केले.रेशीम उद्योगाला शासन सिल्वर समग्र व मनरेगा योजनेतून अनुदान देत आहे, त्यामुळे शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त तुतीची लागवड करावी असे आवाहन यावेळी कृषी कन्यांनी केले. शेतकरी कैलास शिंदे यांनी २०१२ मध्ये रेशीम शेतीला सुरुवात केली,पारंपरिक पिकास फाटा देत त्यांनी रेशीम शेती करण्याचा निर्णय घेतला.त्यासाठी पंचवीस बाय पन्नासचे शेड बांधून त्यांनी ८७ किलो रेशीमचे उत्पादन घेतले.

यासाठी शिंदे यांनी कर्नाटकातील रामनगर मधून रेशीम अंडे आणले व जळगाव येथे या कोषाची विक्री केली. त्यांना यातून ३२० रुपये किलोप्रमाणे २७ हजार रूपये मिळाले .पहिल्या वर्षांमध्ये त्यांना ६० हजारांचे उत्पन्न मिळाले.त्यांना मिळालेले उत्पन्न पाहता अनेक शेतकऱ्यांनी त्यांच्या रेशीम शेतीला भेटी दिल्या. तसेच तूतीबाबत माहिती घेऊन रेशीम शेती करण्यास सुरूवात केली सध्या तालुक्यातील चाळीस शेतकऱ्यांनी मनरेगा मार्फत तुतीची लागवड केली आहे. तुतीची लागवड करून शेतक-यांनी आर्थिक प्रगती साधावी यासाठी कृषी कन्या हया अनेक शेतकऱ्यांना रेशीमबाबत मोफत मार्गदर्शन करीत आहेत या उद्योगातून सरासरी वार्षिक उत्पन्न ८ ते ९ लाख भेटू शकते कृषी कन्या हया शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करून सांगत आहे. रेशीम उद्योगाला दिलेल्या भेटी प्रसंगी मार्गदर्शन करण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत सोनई येथील कृषि महाविद्यालयातील कृषिकन्या निकिता साबळे,प्रतीक्षा ठाणगे,प्रसन्ना पवार,विशाखा मडके,सोनाली पटेकर यांनी सहभाग घेतला.सदर कृषिकन्यांना सोनई कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एच. जी. मोरे, उपप्राचार्य प्रा. एस. व्ही. बोरुडे, कार्यक्रम समन्वयक डॉ. ए. ए. दरंदले व कार्यक्रम अधिकारी डॉ.पी. आर.गिरी यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



# चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा क्षेत्रात होणार १५१ मंदिरांमध्ये आराधना

## सुधीर मुनगंटीवार यांच्या विजय संकल्पासाठी कार्यकर्त्यांचा निर्धार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार तथा राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तसेच चंद्रपूर-वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या विजय संकल्पासाठी संपूर्ण लोकसभा मतदारसंघामध्ये दि. १९ मार्च २०२४ ला एकाचवेळी सायंकाळी ६ वाजता परमेश्वराची आराधना करण्यात येणार आहे. सामान्य कार्यकर्ता व पदाधिकाऱ्यांनी हे अनोखे आयोजन केले आहे. सुधीर मुनगंटीवार यांच्या लोकसभा निवडणुकीतील विजयाकरीता मतदारसंघामधील मंदिरांमध्ये विधिवत पूजा-अर्चना होणार आहे. याकरीता आमदार संजिव रेड्डी बोतकुलवार, आमदार डॉ. संदीप धुर्वे, भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, यवतमाळचे जिल्हाध्यक्ष तारेंद्र बोर्डे,लोकसभा प्रमुख प्रमोदभाऊ कडू, महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, पुजनीय भागवताचार्य संत श्री. मनीष महाराज,रविंद्र बेल्लुरकर, माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संध्या गुरनुले, ब्रिजभूषण पाझारे, डॉ. मंगेश गुलवाडे, विवेक बोढे, प्रज्ज्वलंत कडू, सुरज पेदुलवार, रामपाल सिंग, किरण बुटले, राजू गायकवाड, महेश देवकते, विशाल निंबाळकर, आशिष देवतळे, अनिल डोंगरे, श्रीनिवास जंगमवार, रितीक परचाके, रविंद्र पिंपळशेंडे पुजेचे व्यवस्थापन करतील, अशी माहिती आध्यात्मिक आघाडी लोकसभा सहसंयोजक मयूर चहारे यांनी दिली.

# प्रशमन शुल्काचा प्रश्न गृहनिर्माण मंत्री सावेंमुळे मार्गी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाशी संबंधित एक अतिशय महत्त्वाचा मुद्दा असा की छत्रपती संभाजीनगर महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाची स्थापना सन २०१७ मध्ये करण्यात आलेली आहे. अनियमित बांधकामाच्या प्रशमन शुल्काबाबतचे धोरण दिनांक २१.०२.२०२४ पर्यंत ठरविण्यात आलेले नव्हते. छत्रपती संभाजीनगर महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण अनियमित बांधकामाचे प्रशमन शुल्क (कंपाउंडिंग चार्ज) निश्चित करण्यासाठी धोरणात्मक चौकटीबाबतच्या मार्गदर्शक तत्त्वांसाठी सी. एम. आय. ए., मसीआ, सियाम आणि क्रेडाई या संघटना संबंधित मंत्रालयाच्या वेळोवेळी संपर्कात होते आणि पाठपुरावा करत होते.

छत्रपती संभाजीनगर महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण अंतर्गत येणारे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि सिडको सोडले तर महाराष्ट्रातील इतर सर्व प्राधिकरण जसे कि पुणे, नाशिक, नागपूर आणि मुंबई यांचे प्रशमन शुल्कासंदर्भातील धोरण पूर्वीच ठरविलेले आहे. मराठवाड्यातील जे छोटे भांडवलदार आहेत. त्यांना व्यवसाय सुरु करण्यासाठी जागेची आवश्यकता असते. एम. आय. डी. सी. / डी. एम. आय. सी. या औद्योगिक भागात प्लॉट घेणे, त्यांना शक्य होत नाही. त्यामुळे हे भांडवलदार आपल्या भागातील



३१३ गावात प्लॉट घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थेची रीतसर परवानगी घेऊन त्याचा नियमित कर भरून त्यांचा छोटेखाणी व्यवसाय स्वकष्टातून उभे करतात.

उद्योग संघटनांचा योग्य विचारविनिमयाने, शेवटी अनियमित बांधकाम नियमित करण्यासाठी प्रशमन शुल्क निश्चित करण्याबाबतचे मार्गदर्शक तत्त्वे महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडून प्राप्त झाले होते. नगरविकास विभागाने छत्रपती संभाजीनगर महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाला नाशिक महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात असलेल्या प्रशमन शुल्कांच्या दराचे पालन करण्याचे आदेशित केले होते.

छत्रपती संभाजीनगर महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने नाशिक प्रशमन शुल्कांच्या दर वापरण्याचा आधार म्हणजे हे दोन्ही महानगराचे नगररचना प्राधिकरण हे एकाच वेळी स्थापन करण्यात आले आहे, असे नमूद केले होते .

परंतु, छत्रपती संभाजीनगर महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणा अंतर्गत बांधकाम नियमित करण्यासाठी नाशिकचा दर लागू करणे, हा अत्यंत अन्यायकारक निर्णय होता. त्यामुळे येथील मागास भागातील लघु उद्योजकांवर अन्याय झाला असता आणि छत्रपती संभाजीनगर महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीत येणाऱ्या 313 गावांच्या विकास आणि प्रगतीत अडथळा येण्याची दाट शक्यता निर्माण झाली होती .

**महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने घेतलेल्या निर्णयातील ठळक मुद्दे**

१) नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर महानगर प्राधिकरणाने आकारलेल्या तडजोड/शमन शुल्काच्या सध्याच्या रकमे ऐवजी, संबंधित इमारत मालकांना पहिल्या ६ महिन्यांसाठी ५० % आणि त्यानंतरच्या ६ महिन्यांसाठी ७५ % चक्रवाढ शुल्क म्हणून भरण्याची परवानगी आहे . २) ही माफी योजना शासन निर्णयाच्या तारखेपासून लागू केली जात आहे . ३) १२ महिन्यांच्या निर्दिष्ट कालावधीनंतर, प्रचलित पद्धतीनुसार चक्रवाढ शुल्क आकारले जावे . ४) उक्त प्राधिकरण स्थापन होण्यापूर्वी ग्रामपंचायत क्षेत्रात जी बांधकामे ग्रामपंचायतीच्या परवानगीने झाली आहेत, ती विचारात घेण्यात यावी . मात्र, उर्वरित बांधकामे चक्रवाढ शुल्क आकारून नियमित करावी .

या सर्व बाबींची आणि प्रशमन शुल्क बाबत मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, गृहनिर्माणमंत्री मा.श्री. अतुल मोरेश्वर सावे आणि सचिव मा. श्री. असिमकुमार गुप्ता यांच्याकडे सी. एम. आय. ए., मसीआ, सियाम आणि क्रेडाई या संघटनांनी सतत केलेला पाठपुरावा, वैयक्तिक बैठका तसेच अनेक निवेदनांसह आणि प्रत्यक्ष भेटी घेतल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने १५ मार्च २०२४ रोजी प्रशमन शुल्कांच्या नियमनासाठी (प्रतिलिपीत) जी. आर. पारित केला आहे.

आपल्या भागातील ३१३ गावातील जवळपास 300 च्या वर उद्योगांचा समावेश असलेला प्रशमन शुल्क बाबतचा बराच काळ प्रलंबित प्रश्न होता, ज्यांचे बांधकाम उपक्रम असे कोणतेही नियम/शुल्क लागू नसल्यामुळे ठप्प होते. कोणतेही नियम/मार्गदर्शक तत्त्वे अस्तित्वात नसल्यामुळे एकरकमी प्रशमन शुल्क भरणे फार कठीण होते.

छत्रपती संभाजी नगर महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (CSMRDA) च्या कार्यकक्षेत महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाद्वारे प्रशमन शुल्क (कंपाउंडिंग चार्जे) साठी अभय योजना (ॲम्नेस्टी स्कीम) लागू केल्याने 313 गावांचे CSMRDA च्या अधिकारक्षेत्राखाली बांधकाम आणि विकास नियमित होण्यास नक्कीच मदत होईल. यामुळे या क्षेत्रांतील विस्तार आणि रोजगाराच्या संधी निर्माण करून प्रादेशिक विकासाला चालना मिळेल. तसेच या निर्णयामुळे बांधकाम नियमितीकरणाद्वारे बँक कर्ज लवकर मंजूर करणे सुलभ होईल, जी एक महत्त्वपूर्ण आणि दीर्घकाळ प्रलंबित समस्या होती.

महाराष्ट्र राज्याचे गृहनिर्माण आणि ओबीसी कल्याण मंत्री अतुलजी सावे, प्रसिद्ध उद्योजक उल्हास गवळी या मान्यवरांचे सियाम अध्यक्ष समीर मुळे, अजित मुळे आणि सीएमआयए अध्यक्ष दुष्यन्त पाटील, मसीआ अध्यक्ष अनिल पंडित, किरण जगताप आणि क्रेडाईचे संग्राम पठारे, गोपेश यादव आणि सर्व उदयोजकांनी अभिनंदन केले आणि निर्णयाप्रती आभारी व्यक्त केले आहे.

# रात्रीच्या वेळेस माऊली कृपा गोशाळेस पोलीस संरक्षणाची मागणी मान्य

## यश शहा यांच्या प्रयत्नांना यश

आधुनिक केसरी न्यूज

**अहिल्यानगर :** ॲनिमल वेल्फेअर बोर्ड एच ए डब्ल्यू आर सदस्य तथा अहिल्यानगर जिल्हा कॉर्डिनेटर इंजि. यश प्रमोद शहा यांनी गोशाळेस भेट दिली त्यावेळेस यांच्याकडे माऊली कृपा गोशाळा शहाजापूर चे प्रमुख संचालक शिंदे महाराज जी व इतर सर्व संचालक यांनी रात्रीच्या वेळेस गोशाळेस येणाऱ्या अडचणी निदर्शनास आणून दिले.

शहा यांनी तात्काळ पोलीस अधीक्षक साहेबांशी संपर्क साधून भेटीची वेळ घेऊन सर्व संचालकांसोबत माननीय पोलीस अधीक्षक राकेश जी ओला साहेब तसेच माननीय अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत जी खैरे साहेब नगर तालुका ग्रामीणचे डी वाय एस पी व सुपा पोलीस स्टेशनचे प्रमुख यांच्याशी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात भेट घेऊन साहेबांना अडचणी संदर्भात प्रत्यक्ष भेटीत निवेदन दिले व अडचणी बाबत सविस्तर चर्चा केली साहेबांनी तात्काळ संबंधित पोलीस स्टेशनला याबाबत रात्रीच्या वेळेस पोलीस गस्त घालण्याचे आदेश दिले व इथून पुढे कुठलीही अडचण आल्यास कळवा आपल्या चांगल्या कामास नेहमीच मदत केली जाईल अशी ग्वाही यावेळी दिली.

गोशाळेच्या वतीने या वेळी उपस्थीत गोशाळा अध्यक्ष ह भ प नितीन महाराज शिंदे , नगर जिल्हा प्रमुख इंजी यश शहा ,पायल यश शहा, सचिन शिंदे,राजाराम म्हस्के, रमनलाल जैन, आदी गोभकत उपस्थीत होते. शिंदे महाराजांनी सर्वांना गोशाळेस भेट देण्याची विनंती केली साहेबांनी ते मान्य करून लवकरच भेट देऊ असे आश्वासन दिले. यश शहा यांनी जिल्ह्यातील सर्व गोशाळांची एकत्रित मीटिंग घेऊन अडचणी सोडवण्याची विनंती केली यावर तात्काळ पोलीस अप्पर अधीक्षक खैरे साहेबांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच मिटींगचे नियोजन केले जाईल असे शहा यांना सांगितले .

माऊली कृपा गोशाळा दहा वर्षापासून अतिशय कठीण परिस्थितीत उत्तम असे गौसेवेचे कार्य करत आहे .

नितीन जी महाराज व त्यांचे संपूर्ण कुटुंबीय या सेवेत स्वतः कार्यरत आहेत. 700 पेक्षा जास्त पशुधन आज दुष्काळी परिस्थितीत आहे ते सांभाळत आहे. यश शहा यांच्या प्रयत्नातून त्यांना आदी जिन युवक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई चे अध्यक्ष जयेश भाई शहा व त्यांच्या टीम वतीने गोनिवास शेड बांधून देण्यात येणार आहे. आदिजीन संस्थेचे जयेश भाई शहा यांनी अहमदनगर जिल्ह्यासाठी कॉर्डिनेटर यश यांच्या विनंतीनुसार जिल्ह्यातील सर्व गोशाळांसाठी वीस लाखांचा धनादेश चारा पाणी ,सोलर शेड अशा विविध कामांसाठी जिल्ह्यातील अनेक गोशाळा संचालकांना सुपूर्तही केला आहे. आदि जीन संस्थेचे जिल्ह्याच्या वतीने खूप खूप धन्यवाद .

संचालक नितीन जी महाराज यांनी अहिल्यानगर वासियांना गोशाळेस नक्की भेट द्यावी व दुष्काळी परिस्थितीत सर्वांनी गोसेवेसाठी मदत करावी असे आवाहन केले आहे.



# मतदान हे श्रेष्ठ दान : तहसीलदार सांगडे

आधुनिक केसरी न्यूज

**शहरटाकळी :** भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश आहे.लोकशाहीचा पाया भक्कम करण्यासाठी प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी व तिचे संवर्धन करण्यासाठी निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन मतदान जनजागृती केली पाहिजे.आपण सर्वांनी मिळून आपल्या गावातील मित्र,नातेवाईक व इतर मतदारांना मतदानाचे महत्त्व पटवून द्यावे.सर्व दानामध्ये मतदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. प्रतिपादन तहसीलदार प्रशांत सागडे यांनी केले.

शेवगाव तालुक्यातील दहिगाव- ने येथे लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय व नवजीवन जुनिअर कॉलेज दहिगाव-ने व तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 अनुषंगाने 222 शेवगाव विधानसभा मतदारसंघातील कॅम्पस ॲम्बेसिडरची बैठक व मतदार जनजागृती अभियान कार्यक्रमाचे आयोजन प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी मा.प्रशांत सांगडे सागडे बोलत होते. सदर कार्यक्रमास जिल्हाधिकारी मा.सिद्धाराम सालीमठ व उपविभागीय अधिकारी मा.प्रशांत मते यांचे मार्गदर्शनाने लाभले.महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये मतदानाची जनजागृती व्हावी याकरिता निबंध वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते

यावेळी व्यासपीठावर अप्पर तहसीलदार माननीय राहुल गुरव, शिक्षण विस्तार अधिकारी मा.श्रीमती शैलजा राउळ सहायक निवड अधिकारी मा. रमेश गोरे, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी. के.वाय. नजन, डॉ.शरद कोलते, प्राचार्य सुनिल शिंदे, डॉ. निलेश खरात, डॉ.रमेश खैरे, प्रा.काकासाहेब घुले, मधुकर घाडगे, सोपान सतरकर,विजय काशिद,सुनिता ढगे आदि उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मतदाराची प्रतिज्ञा यांनी दिली.

यावेळी घेण्यात आलेल्या वक्तृत्व व निबंध स्पर्धेत वक्तृत्व स्पर्धेत कु.मरकड प्रियंका, कु.घुणे अश्विनी, कु.कोल्हे विद्या तर निबंध स्पर्धेमध्ये कु.उंदरे समीक्षा कु.जाधव समीक्षा , कु.शेळके ज्ञानेश्वरी यांनी पारितोषिक पटकवले , परीक्षक म्हणून बाळासाहेब मंडलिक,अनिता नेव्हल व प्रा.आप्पासाहेब खंडागळे यांनी काम पाहिले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

सूत्रसंचालन मकरंद बारगुजे व राजेंद्र नाबदे यांनी केले तर आभार पर्यवेक्षक सुरेश शेरे यांनी मानले.

# निवडणुकीच्या तयारीसंदर्भात नोडल अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा

## जिल्हाधिकाऱ्यांच्या सर्व यंत्रणेला सुचना

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर जिल्ह्यात निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. 13 - चंद्रपूर लोकसभा मतदार संघाची निवडणूक पहिल्या टप्प्यात म्हणजे 19 एप्रिल 2024 रोजी होणार आहे. या अनुषंगाने जिल्हास्तरीय नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले असून जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी सर्व नोडल अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा घेतला. नियोजन भवन येथे बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक रिना जनबंधू, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, मनपा आयुक्त विपीन पालीवाल यांच्यासह सहा. निवडणूक अधिकारी, उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी, तहसीलदार व इतर विभागाचे विभाग प्रमुख आदी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, जिल्ह्यात 17 विषयांसाठी नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांच्या सहकार्यासाठी इतरही अधिकारी नियुक्त करण्यात आले असून प्रत्येकाने आपापली जबाबदारी गांभियाने पार पाडावी.

निवडणूक हा कालबध्द कार्यक्रम असून चंद्रपूर लोकसभा मतदार संघाची निवडणूक पहिल्याच टप्प्यात आहे. त्यामुळे प्रत्येकाने सुक्ष्म नियोजन करून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांचे वाचन करणे आवश्यक आहे. त्यानुसारच काम करणे अपेक्षित आहे. यात वेळी कोणताही हलगर्जीपणा चालणार नाही. काही शंका असल्यास त्या विचारून घ्याव्यात.

पुढे जिल्हाधिकारी म्हणाले, सर्व सहायक निवडणूक अधिका-यांनी आपापल्या विधानसभा क्षेत्रातील स्ट्राँग रुमची पाहणी करावी. तेथील बंदोबस्त, सीसीटीव्ही कॅमेरे, स्ट्राँगरुमची सुरक्षितता आदी बाबी तपासून घ्याव्यात. तसेच आपापल्या क्षेत्रातील फिरते निगराणी पथक (एफ.एस.टी.), स्थायी निगराणी पथक (एस.एस.टी.), व्हीडीओ निगराणी पथक (व्ही.व्ही.टी.), व्हिडीओ पाहणी पथक (व्ही.एस.टी.) त्वरीत कार्यान्वित करून पथकांच्या पॉईंटवर भेट द्यावी.

# किनगाव फाटा ते लोणी डांबरी व सिमेंट रस्त्यासाठी अडीचशे कोटी रुपये

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील किनगाव फाटा ते बाजार सावंगी इंदापूर बोडखा लोणी पर्यंत रस्त्यासाठी ज्यात काही डांबरीकरण मजबुतीकरण सिमेंटीकरण रस्ता कामांचे नियोजन असुण अडीचशे कोटी रुपयांची मंजुरी असुण निवडणुक तथा आचारसंहिता संपल्यानंतर कामाची प्रक्रिया असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपाभियंता कोलते यांनी दिली. इंदापूर ते बोडखा रस्त्याची दुरवस्था व नागरिकांकडून आमरण उपोषण तथा रस्तारोको करण्याचा इशारा दिल्यानंतर चर्चात याविषयी माहिती दिली. इंदापूर ते बोडखा रस्त्यांची दुरावस्था असुण खडी उखडलेली, खड्डे,अरूंद रस्ता, सर्वत्र पुलासाठी खोदलेल खड्डे आदि मोठा त्रास गत दोनतीन वर्षांपासून नागरिक तथा वहानधारकांना सुरु आहे. विभाग यंदा-यंदा करत वेळ मारुन नेत आहे. त्रास मात्र नागरिकांना सहन करावे लागत आहे.आता अधिकचा त्रास होत असल्याने नागरिक व वहानाधारकांनी आमरण उपोषण व रस्ता रोको चा हत्यार उपसले आहे.या संदर्भात उपभिंयता कोलते खुलताबाद यांना रस्त्याबाबत छेडले असता त्यांनी सांगितले की अडीचशे कोटी रुपये मंजूर असुण यात किनगाव फाटा ते येसगाव एक, दोन., बाजार सावंगी, इंदापूर ते बोडखा या दरम्यान डांबरीकरण मजबुतीकरण व सिमेंटीकरण रस्ता करण्याचें नियोजन असुण रस्ते चोपडे गुळगुळीत करू मात्र निवडणुक तथा आचारसंहिता संपल्यानंतर कामाची प्रक्रिया सुरु करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.



# समर्थ सेवेकऱ्यांचा गोदा स्वच्छता अभियानात सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा मार्ग आणि त्र्यंबकेश्वर समर्थ गुरुपीठाच्या आरोग्य विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या गोदा स्वच्छता अभियानात 350 सेवेकऱ्यांनी सहभागी होऊन गोदाकाठ स्वच्छ केला.याच निमित्ताने गोदाकाठी असलेल्या श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात आयोजित आरोग्य तपासणी व मोफत औषधी वाटपाचा 306 रुग्णांनी फायदा घेतला.
गेल्या दोन वर्षांपासून श्री स्वामी समर्थ सेवामार्गाच्या वतीने त्र्यंबकेश्वर आणि नाशिक तीर्थक्षेत्री स्वच्छता मोहिम राबविण्यात येत आहे. यात गुरुपीठाचे व्यवस्थापक चंद्रकांतदादा मोरे हे नियमितपणे उपस्थित राहून महिला पुरुष सेवेकऱ्यांना यानिमित्त मार्गदर्शन करून, स्वच्छता अभियानात स्वतः सहभागी होत असतात.

रविवारी झालेल्या मोहिमेत सुद्धा चंद्रकांतदादा मोरे स्वच्छता कार्यासाठी आणि आरोग्य शिबिरासाठी बालाजी कोट केंद्रात एकत्रित झालेल्या शेकडो सेवेकऱ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, भारतात, महाराष्ट्र आणि त्यातही नाशिक सारख्या पुण्यभूमीत आपण जन्म घेतला ही खूपच भाग्याची बाब आहे. गंगामाईची सेवा करण्याची संधी आपणास मिळाली ही महतभाग्याची गोष्ट आहे. गेली दोन वर्ष आपण ही पर्वणी साधतो आहे. भविष्यात सुद्धा हे स्वच्छता अभियान अखंडपणे आपण राबविणार आहोत आणि त्यासाठी आपण असाच उत्साहाणे सहभाग नोंदवावा. जिल्हा प्रतिनिधी केशवर घोडेराव सेवामार्गाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. आरोग्यदूत विभागातर्फे योगशिक्षक राजेंद्र लोखंडे यांनी निरामय व आनंदी जीवनासाठी योग, ओंकार साधना, प्राणायाम यांचे महत्व सांगून 7 एप्रिल जागतिक आरोग्य दिनानिमित्त आयोजित



एकदिवस योग शिबिराचे प्रशिक्षण घेऊन तसेच सहभागी होऊन स्वतःच्या शारीरिक व मानसिक विकासासोबत इतरांचाही फायदा करून देण्यासाठी प्रचार व प्रसार करावा असे आवाहन केले.

आरोग्यदूत जिल्हा प्रतिनिधी सुनीता काकड यांनी आरोग्यदूत संकल्पना, आजीबाईचा बटवा याविषयी माहिती दिली. डॉ. जैन यांनी रुग्णांची रोगनिदान तपासणी करून त्यांना मोफत औषधी वाटप केले.
सर्व सेवेकाऱ्यांनी गंगा गोदातीरी असलेल्या रामकुंड, गोदावरी मंदिर व परिसराची स्वच्छता करून त्याठिकाणच्या देवीदेवतांचा मानसन्मानही केला. या अभियानाचे नियोजन प्रशासकीय विभागाचे काळे तात्या, सुवर्णा काठे, सरोदे ताई,आरोग्यदूत तालुका प्रतिनिधी पुरकर सर, प्रतिभा पुरकर, पुष्पा जमधडे, मनीषा लोखंडे, व इतर आरोग्यदूत प्रतिनिधी यांनी केले. श्रमदान विभाग तसेच इतर 18 विभागाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गोदा तीर व परिसरात असलेला प्लास्टिक कचरा, झाडून स्वच्छ करण्यात आला. नदीपात्रातील फुले इतर कचरा मिळून 25 गोणी कचरा गोळा करण्यात आला.

# जन्मतःच आपण सगळेच नास्तिक आहोत

## अभिजित देशपांडे : पुण्यात नास्तिकांचा मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**फलटण :** सध्या आपण अशा काळात जगतो की,तिथे देव आणि धर्म हीच आपली खरी आयडेंटिटी बनविली जातेय. व्यक्तीचं रूपांतर एक झुंडीचा सदस्य म्हणून केलं जातंय.अशा काळामध्ये माझ्या मते नास्तिकता ही नैतिक भूमिका आहे.ती नैतिक,राजकीय आणि सांस्कृतिक भूमिका आहे.पण मेळावा म्हणून आपण इथे जमलेलो असलो तरी झुंड म्हणून आपण जमलेलो नाही.
आणि आपल्या हातात एकच कुठलाही असा झेंडाही नाही.या अर्थाने आपण नास्तिकतेच्या वाटेवरचे सह प्रवासी आहोत.
खरतर एक साधा मुद्दा समजून घ्यायला पाहिजे.जन्मतःच आपण सगळेच नास्तिक आहोत.असे प्रतिपादन एक होता कारसेवक या पुस्तकाचे लेखक अभिजित देशपांडे यांनी केले.ते पुणे येथे भगतसिंग विचार मंच यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या नवव्या महाराष्ट्र नास्तिक मेळाव्यातून बोलत होते.
आस्तिकतेकडून नास्तिकतेकडे हा विषय त्यांना देण्यात आला होता.यावेळी विचारमंचावर मानसोपचारतज्ज्ञ,क्लिनिकल मानस शास्त्रज्ञ,लेखक डॉ.प्रदीप पाटील,विद्यालंकार घारपुरे, डॉ.महादेव उनवणे,ॲड.मनीषा महाजन,ज्योती कांबळे आदी उपस्थित होते."जग हे नास्तिकांचे" हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले.पुस्तकातील लेखन हे विद्यालंकार घारपुरे,डॉ.महादेव उनवणे,क्रांती पोतदार,ॲड.मनीषा महाजन,ज्योती कांबळे यांनी केलेले आहे.लेखकांचे सुद्धा विशेष कौतुक करण्यात आले.
लेखक अभिजित देशपांडे पुढे म्हणाले की,परंपरेने आणि संस्काराने आपल्या मध्ये श्रद्धा निर्माण केली जात असते. आपल्याला आस्तिक बनविलं जातं.
आस्तिकता आपल्याला श्रद्धा आणि संस्कारामधून मिळते.त्या आस्तिकतेमध्ये एक प्रकारची सुरक्षितता असते.आस्तिकतेपोटी आपण त्या समूदायाचा स्वतःला भाग समजता.पण नास्तिकता त्या श्रध्दा आणि विशिष्ट परंपरेला नाकारते.ईश्वर या संकल्पनेवर जे असलेलं आपलं बौद्धिक किंवा भावनिक समुदायनिष्ठ म्हणून परावलंबीत्व आहे.
समुदाय म्हणून आपण इतरांवर अवलंबून आहोत.
ते समुदाय निष्ठ श्रद्धेचे परावलंबीत्व विसर्जीत करतो.त्यातला आयतेपणा आपण विसर्जित करतो.एका अर्थाने आपण विवेकाच्या बळावर उभा होतो.हे होणं म्हणजे नास्तिक होणं आहे. खरतर नास्तिकता मध्ये एक प्रकारे नकारात्मक ध्वनीत होते.आपल्याला जर कुणी देव धर्म नाही शिकविला तर आपण नास्तिकच आहे. आस्तिकता ही रुजविली गेलेली गोष्ट आहे. वैज्ञानिक दृष्टितून आपण शब्दाना अधिक धारदार बनविले पाहिजे. नास्तिकता हा एक परिणाम आहे.तिला स्वयंभु असे काही मूल्ये आहे. नास्तिकतेचं मुळ हे ज्ञान विवेक,करुणा यांमध्ये आहे. ज्ञान आणि विवेक नास्तिकचे ते उगमस्थान आहे.मी हिंदुत्ववादी नाही.तर नास्तिक आहे, असे सुद्धा त्यांनी सांगितले. लेखक डॉ.प्रदीप पाटील म्हणाले की, जो देव आणि धर्म नाकारू शकतो.तोच विचार करू शकतो. जो देव आणि धर्म स्वीकारतो तो फक्त धर्म ग्रंथात काय सांगितले आहे आणि देव काय म्हणतो एवढाच तो विचार करू शकतो.पुढचा विचार करत नाही. चिकित्सक विचार करत नाही.तो आस्तिक म्हणून राहु शकतो. विवेकवादी होऊ शकत नाही.हा नास्तिकांचा मंच नसून विवेकवादाचा संघर्ष आहे.असे सुद्धा त्यांनी सांगितले. चार्वाक ते पेरियार प्रवास विवेकवादाचा या विषयावर त्यांनी अगदी परखडपणे मांडणी केली.
"नास्तिक बना" ही कविता दिलीप महादर यांनी सादर केली. शाहीर दत्ता मरळीकर आणि त्यांचे सर्व सहकारी यांच्या कडून गाणे सादरीकरण करण्यात आले. भगतसिंगांच्या वाटेवरती चला गड्यांनो चला,मेरा रंग दे बसंती, हम नास्तिक है ही प्रेरणादायी गाणी सादर करण्यात आली. सूत्रसंचालन संजय सावरकर यांनी केले. तर प्रास्ताविक अश्विनी सातव आणि आभार प्रदर्शन विवेकभाई पूनावाला यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विवेकभाई पुनावाला, दर्शना कुंटे, क्रांती पोतदार, रोहिणी महाजन, अश्विनी सातव,अरुणा यशवंते, प्रिया दुसाने, शुभम कडू, प्रतीक कालेकर,गजानन बिराजदार, भानुदास दुसाने, विशाल भालेराव, दत्ता मरळीकर, संतोष हेगडे, संदीप कांबळे, विनोद खरटमोल, राहुल माने, दादाजी यशवंतराव, विजय कांबळे, संजय सावरकर, सोहम व्होरा, विवेक गायकवाड, संतोष साळुंके, डॉ. नितीन हांडे, स्मिता सिरसाट, निषाद माने आदीं सह इतरांनी विशेष मेहनत घेतली. या मेळाव्यास राज्यातीलच नव्हे गुजरात, गोवा आदी राज्यातून नास्तिक आले होते.

**नास्तिकतेची भूमिका घेऊन जगायला पाहिजे : डॉ .प्रदीप पाटील**
मानसोपचारतज्ञ,क्लिनिकल मानस शास्त्रज्ञ,लेखक डॉ .प्रदीप पाटील म्हणाले की,मी अर्धवट आस्तिक होतो .कारण मला अनेक प्रश्न पडत होते की,देव आहे की नाही ? धर्म मानावा की न मानावा ? आणि आस्तिक असताना जे दैनंदिन जीवनात येणारे जे प्रश्न होते ते कसे सोडवावे .त्यावेळी त्या प्रश्नांची उत्तरे पिंगा घालत होती . चळवळीत ३० वर्ष एक मत बनत गेलं आणि ते मत अर्थात नास्तिकतेचं होतं .चळवळीत असताना असं नेहमी वाटायचं की भूमिका काय होती की आम्ही देवा धर्माचा आदर करत होतो .ही चळवळीची भूमिका होती .मी ती इमाने इतबारे पार ही पाडत होतो .पण मनात असं कुठं तरी वाटत होतं .नाही,नास्तिकतेची भूमिका घेऊन जगायला पाहिजे . म्हणून जिथे जिथे नास्तिकता असेल तिथे तिथे मी आवर्जून जातो .मी हे माझं स्वत :च घर समजतो .आणि तुम्ही सर्वजण माझे खरे नातेवाईक आहात .असे मी मानतो .असे सुद्धा त्यांनी म्हटले .





# फुलंब्रीचा पाणीपुरवठा सुरळीत करा

## माजी नगराध्यक्ष सुहास शिरसाठ यांचे प्रशासनाला निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरांमध्ये पाच दिवसांआड पाणी सुरू असून उन्हाळ्यात नागरिकांची पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती होत आहे. त्यामुळे फुलंब्री शहरातील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा तत्काळ सुरळीत करावा, असे निवेदन माजी नगराध्यक्ष सुहास शिरसाट यांच्या नेतृत्वात नगरपंचायत प्रशासनाला सोमवारी (ता.१८) देण्यात आले.
निवेदनात म्हटले की, फुलंब्री बृह मध्यम प्रकल्पातील अनेक विहिरींमध्ये शहराला पुरेल इतका पाणीसाठा सध्या उपलब्ध आहे. तरीही शहराला पाच दिवसांआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे. मागील वर्षी यापेक्षा अतिशय पाणीटंचाई होती. मात्र, नगरपंचायतीने योग्यरित्या उपाययोजना व नियोजन करून शहराला एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा प्रयोग यशस्वी केला. यंदा शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्याताठी परिसरातील जास्त पाणी असलेल्या विहिरींचे अधिग्रहण करावेत, शहरांतील नादुरुस्त हातपंप तत्काळ दुरुस्त करावेत, तसेच वाड्यावस्त्यांवर पाणी टँकरने उपलब्ध करून द्यावे, जेणेकरून नागरिकांत पाणीटंचाईचे सावट काही प्रमाणात कमी होईल. त्यामुळे पाणी प्रश्नावर तत्काळ उपाययोजना कराव्यात, असे निवेदन माजी नगराध्यक्ष सुहास शिरसाठ यांच्या नेतृत्वाखाली नगरपंचायत प्रशासनाला देण्यात आले. या निवेदनावर माजी नगराध्यक्ष सुहास शिरसाठ,भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष वाल्मीक जाधव, गणेश राऊत, अकबर पटेल, संतोष जाधव, पंडित नागरे, संतोष आघाडे, महेश देवमाळी, रमेश नागरे, सुमित प्रधान, सुदाम पवार, गजानन नागरे यांच्यासह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# सद्यपरिस्थितीत पत्रकारांनी अधिक सजग होण्याची गरज

## खासदार अमोल कोल्हे : पुण्यात पत्रकार संघाच्या अधिवेशनाचा शानदार समारोप

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** लोकशाहीची मूल्ये टिकवून ठेवण्यासाठी चौथ्या खांबाची भूमिका मोलाची असून सद्य परिस्थितीत पत्रकारांनी अधिक सजग होण्याची खरी गरज आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध अभिनेते, खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी चिंचवड- पुणे येथे केले. तर पत्रकारांनी बरं नव्हे तर खरं लिहिले पाहिजे असे सांगुन पत्रकार कोणत्याही पक्ष विचारांचा नसतो तो फक्त बातमीचा असे स्पष्टीकरण प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी अध्यक्षीय समारोपात केले.

पुणे येथे शनिवार दिनांक १६ मार्च रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई आणि पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या वतीने आयोजित राज्यससतरीय अधिवेशनाच्या समारोप झाला.

प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली दोन सत्रात झालेल्या अधिवेशन समारोपला  खासदार अमोल कोल्हे, माजी मंत्री, आमदार बच्चूभाऊ कडू, आमदार महेश लांडगे, आदी मान्यवरांची उपस्थिती झाला.  उद्घाटन सकाळी  प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे,ज्येष्ठ लेखक अरविंद जगताप, ज्येष्ठ पत्रकार निरंजन टकले, महेश म्हात्रे, मंदार फणसे, आशिष जाधव, प्रदेश सरचिटणीस डॉ.विश्वास आरोटे, उपाध्यक्ष नितीन शिंदे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष पराग कुंकुलोळ, यांच्या उपस्थितीत झाले. समारोपाल कामगारांचे लढवय्ये नेते तथा ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव, भोसरी मतदार संघाचे महेश लांडगे, शिरूर मतदारसंघाचे  खासदार डॉ.अमोल कोल्हे, आ. उमा खापरे,राजकीय विश्लेषक उदय निरगुडकर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, नगरसेवक मोरेश्वर भोंडवे,चेतन भुजबळ  आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी जेष्ठ पत्रकार डॉ. उदय निरगुडकर म्हणाले, पत्रकारितेच्या क्षेत्रात AI चा शिरकाव पत्रकारांच्या बेरोजगारीत वाढ करणारा भासत आहे. आज देशाच्या कानाकोपऱ्यात विविध प्रकारचे चैनल, यूट्यूब चैनल, डिजिटल माध्यम उदयास येत आहेत विविध माध्यमे आपापल्या पद्धतीने उत्तम रित्या सामाजिक प्रश्नांची मांडणी करत आहेत.

हे करत असताना काही महत्वाच्या गोष्टीचे भान ठेवणे महत्वाचे आहे. पत्रकारांनी निष्पक्षपातीपणा, विश्वासार्हता टिकविणे अत्यावश्यक आहे.बातमी की जाहिरात या द्विधा संकटातूनही पत्रकाराला जावे लागते असे मत मांडले.तर

अमृतकाळातील माध्यम स्वातंत्र्य, भविष्य आणि पत्रकारितेतील राम' या परिसंवादात प्रसिद्ध लेखक अरविंद जगताप, ज्येष्ठ पत्रकार निरंजन टकले, महेश म्हात्रे, मंदार फणसे, आशिष जाधव सहभागी झाले. अमृतकाळातील माध्यम स्वातंत्र्य, भविष्य आणि पत्रकारितेतील राम यावर चर्चा करताना माध्यमांना आज सर्दी झाली आहे का? आजचा निर्भिड पत्रकार कोण? पत्रकारांवर कोणकोणत्या प्रकारचे दबाव असतात? पत्रकारितेत युट्यूब महत्त्वाचा रोल निभावत आहे का? शेतकरी, कामगार, सामान्य नागरिक यांचे प्रश्न माध्यम निष्पक्ष मांडतात का? यावर मान्यवरांनी आपली निर्भिड मते मांडली. हा परिसंवाद रंगतदार ठरला.

दुसऱ्या सूत्रामध्ये बोलताना प्रदेश सरचिटणीस डॉ.विश्वास आरोटे म्हणाले, सर्व जिल्ह्यातील पत्रकारांवरचे संघटन व्यापक निर्माण करून पत्रकार मजबुती देणे हा या अधिवेशनात्मक उद्देश आहे.



**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे 25 हजाराहून अधिक सदस्य : प्रदेशाध्यक्ष**
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले, आलिकडे राजकीय लोक पत्रकारांनाही हा या विचाराचा तो त्या नेत्याचा अशी विभागणी करतात मात्र पत्रकार कोणाचाच नसतो तो केवळ बातमीचा असतो. बरं लिहिण्यापेक्षा खरं लिहिणे जास्त अपेक्षित आहे. वृत्तपत्रांचे अर्थकारण यावरही मंथन होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्यभरात पंचवीस हजाराहून अधिक अधिक पत्रकार सदस्य आहेत. त्यांच्या विविध प्रश्नासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ कार्यरत आहे. सर्वाधिक सदस्य संख्या असलेला हा राज्यातील एकमेव संघटना आहे, असे सूतोवाच केले.

**सत्यशोधक पत्रकार लढवय्या असतो : बाबा आढाव**
जेष्ठ बाबा आढाव म्हणाले, पत्रकारांच्या जीवनामध्ये नेहमीच संघर्ष व लेखणीतून लढाया असतात. राज्यातील सर्व पत्रकार एका ठिकाणी पाहण्याचा हा पहिलाच योग असावा पत्रकार हा समाजातील विविध प्रकारच्या समस्यांची नाडी जाणणारा डॉक्टरच असतो. त्यामुळे त्याने निर्भयपणे उत्तम लिखाण मांडावे. जेणेकरून सामाजिक हित जपण्यासाठी मदत होईल.
**राज्य अधिवेशनाला देवेंद्र फडणवीस,**

**शरद पवार यांचा शुभेच्छा संदेश** : चिंचवड येथे पार पडलेल्या राज्य अधिवेशनाला राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मुख्यमंत्री शरद पवार यांनी संदेश पाठवून शुभेच्छा दिल्या. पवार यांनी शुभेच्छा संदेशात सांगितले, पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो आज पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये अनेक आव्हाने आहेत. लोकशाहीला मजबूत ठेवण्यासाठी निर्भीड पत्रकारिता आवश्यक आहे.

**पत्रकारांमुळेच मी आमदार : बच्चू कडू**
आमदार बच्चू कडू म्हणाले, एक सामान्य घरातील कार्यकर्ता ते आमदार होणं हे पत्रकारांमुळे शक्य झाले मात्र आज जाहिरात व पत्रकारिता याची रसमिसळ होत आहे. त्यामुळे चांगल्या पत्रकारांना त्रास सहन करावा लागतो. यासाठी हातातील लेखणी मजबूत असावी असा सल्ला त्यांनी दिला.

# गडचिरोलीत चार नक्षल्यांना कंठस्नान

## कोलामार्का जंगलात पोलिस-नक्षल्यांमध्ये चकमक

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रकांत पतरंगे**

**गडचिरोली :** जिल्ह्यातील कोलामार्का जंगल परिसरात पोलिस व नक्षल्यांमध्ये आज 19 मार्च च्या पहाटे चकमक झाली. या चकमकीत चार नक्षल्यांचा खात्मा झाल्याची माहिती पुढे येत आहे. चकमकीनंतर पोलिसांनी घटनास्थळी सर्चिंग ऑपरेशन सुरू केले आहे.

कोलामार्का जंगल परिसरात आज पहाटे पोलिसांचे सर्चिंग ऑपरेशन सुरु होते. यावेळी नक्षल्यांनी पोलिसांच्या दिशेने अंदाधुंद गोळीबार केला. प्रत्युत्तर देत पोलिसांनी नक्षल्यांच्या दिशेने गोळीबार केला. यांनतर पोलिसांनी राबवलेल्या सर्च ऑपरेशन नक्षल्यांचे चार मृतदेह आढळून आले. पोलिसांनी घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात नक्षल शस्त्र साठा व साहित्य जप्त केले. येत्या लोकसभा निवडणुकीच्या एमसीसी कालावधीत विध्वंसक कारवाया करण्याच्या उद्देशाने तेलंगणा राज्य समितीच्या काही सदस्यांनी तेलंगणातून प्राणहिता नदी ओलांडून गडचिरोलीला गेल्याच्या विश्वसनीय माहितीच्या आधारावर गडचिरोली पोलीसांनी रात्री केलेल्या कारवाईत नक्षलवाद्यांचा डीव्हीएम वर्गेश मांगी सह चार माओवाद्यांचा खात्मा करण्यात यश मिळवले आहे.

प्राप्त माहितीनुसार तेलंगणा राज्य समितीच्या काही सदस्यांनी तेलंगणातून प्राणहिता नदी ओलांडून गडचिरोलीला आले असल्याच्या माहिती वरुन उप पोलीस मुख्यालयातून सी ६० आणि सीआरपीएफ क्यूआरटीची अनेक पथके अतिरिक्त एसपी ऑपरेशन यतीश देशमुख यांच्या नेतृत्वाखाली क्षेत्र शोधासाठी रवाना झाली. रेपनपल्लीच्या 5 किमी अंतरावर कोलामार्का पर्वतरांगामध्ये रात्री शोध घेत असताना ४ अहेरी मुख्यालयातील सी ६० दलांचा समावेश असलेल्या एका पथकावर नक्षलवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार केला, त्याला पोलिस पथकांनी जोरदार प्रत्युत्तर दिले.

गोळीबार थांबल्यानंतर आणि परिसराची झडती घेतल्यानंतर ४ पुरुष नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले आहेत. गोळीबाराच्या ठिकाणाहून १ एके ४७, १ कार्बाइन आणि २ देशी बनावटीचे पिस्तूल, नक्षलवादी साहित्य आणि सामान जप्त करण्यात आले आहे. यात वरगेश मांगी इंद्रावेल्ली क्षेत्र समितीचा सचिव आणि कुमुराज भीम मंचेरियल विभागीय समितीचा सदस्य डीव्हीसीएम वर्गेश मांगी सिरपूर चेन्नूर क्षेत्र समितीचा सचिव मांगतू, पलटन सदस्य कुरसंग राजू, पलटन सदस्य कुडिमेट्टा व्यंकटेश यांचा समावेश आहे. या सर्वांवर एकत्रितपणे महाराष्ट्र सरकारने ३६ लाखांचे रोख बक्षीस घोषीत केले आहे. परिसर पुढील शोध आणि नक्षलविरोधी कारवाया सुरू आहेत.



# अॅड. शिरसाठ यांची निवड झाल्याबद्दल सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथील अॅड. त्रिंबकराव शिरसाठ यांची IFFCO मराठवाडा विभागाच्या RGB पदी निवड झाल्याबद्दल फुलंब्री येथे सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी ज्येष्ठ नेत्या सौ. पार्वती अक्का शिरसाठ, देवगिरी बँकेच्या संचालिका श्रीमती मंगलताई वाहेगावकर काकू, भाजपा महिला मोर्चाच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्षा सौ. पुष्पाताई काळे, जिल्हा सरचिटणीस सौ. ऐश्वर्याताई अभिषेक  गाडेकर पा. शिरसाठ, सौ. राणीताई सोनवणे व आदींची उपस्थिती होती.



# अंजू गायकवाडचे स्पर्धा परीक्षेत यश

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरातील संजय गायकवाड यांची मुलगी अंजू गायकवाड स्पर्धा परीक्षेत बिकट परिस्थितीमध्ये अभ्यास करून मिळाले घवघवीत यश फुलंब्री शहराला तालुक्याला दिला आदर्श. घरची परिस्थिती अत्यंत प्रतिकूल, अश्या परिस्थितीत काका काकू, आई वडिलांनी स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन अंजुचे  शिक्षण पूर्ण केले. काका व वडिलांचा अंजुच्या शिक्षणासाठी असलेला अट्टहास अंजुने सार्थ ठरवत 2023 मध्ये घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत यश मिळवत अधिपरिचरिका पदी निवड होऊन जळगाव येथील शासकीय मेडिकल महाविद्यालय व हॉस्पिटल येथे नियुक्तीचे पत्र मिळाले.

घरची परिस्थिती बेताचीच गरिबी पाचवीला पुंजलेली, पडेल ते काम करून घरचा उदरनिर्वाह चालवायचा काम मिळाले तर घरी खायला अश्या परिस्थितीत काका आणि वडिलांनी शिक्षणासाठी केलेला अट्टाहास  अश्या परिस्थितीत अंजुने मिळवलेल्या यशाबद्दल आजी आजोबा मामा मामी काका काकू यांच्यासह समाज बांधव व मित्रपरिवाराच्या वतीने आनंद साजरा करत अंजुचा सत्कार करण्यात आला या वेळी आजोबा लक्ष्मण जाधव, ममताबाई जाधव, मामा भाजप युवा मोर्चा शहराध्यक्ष वाल्मीक जाधव, संतोष जाधव, आई वडील संजय गायकवाड, संगीता गायकवाड,काका काकू ज्ञानेश्वर गायकवाड, राधाबाई गायकवाड, रामेश्वर गायकवाड, उषाबाई गायकवाड, विशाल गायकवाड, प्रेम जाधव,यश गायकवाड, संगीताबाई पगडे, अनिता वडोदे, निर्मला भगुरे, आशाबाई संकपाळ यांच्यासह मोठ्या संख्येने समाज बांधव परिसरातील उपस्थित होत.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर